संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

शनिवार,
२३–२९ जानेवारी २०१६
मूल्य रु.१०





**मराठी कवितेतील पुरुष**

आनंद करंदीकर

**गात गात गळून गेले पिकले पान**

नरेंद्र चपळगावकर




MKCL चे विद्यार्थी विकास केंद्री स्किल डेव्हलप्मेंट कोर्सेस
कंप्यूटरशी मैत्री,
स्मार्ट करियरची खात्री MS-CIT
MS-CIT नंतर मी काय करु शकतो?
लेटर, ग्रीटिंग कार्ड, रिपोर्ट अशी आऊटपुट्स करु शकेन
मी माझा छान प्रोजेक्ट रिपोर्ट बनवू शकेन
मी ऑडॅसिटीचा वापर करुन ऑडिओ रेकॉर्ड आणि एडिट करु शकेन
माझा व्हिडीओ बायोडेटा बनवू शकेन
माझ्या कामासाठी आकर्षक जाहिराती बनवू शकेन
ठराविक ठिकाणी पोहाचण्यासाठी गुगल मॅप्सवरुन पत्ता शोधू शकेन
गुगलवरुन मी हवी ती माहिती मिळवू शकेन आणि वापरु शकेन
मी नेट बँकिंगद्वारे बँकेचे व्यवहार घरबसल्या करु शकेन
मी स्क्रॅच प्रोग्रॅमिंग करुन वेगवेगळे ॲनिमेटेड गेम्स तयार करु शकेन
सोशल मीडियामधून माझी नाती जोडू शकेन
MS-CIT नंतर पुढे...
क्लिक करियर ओरिएंटेड कोर्सेस
KLiC कोर्सेसची वैशिष्ट्ये
▪ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मान्यताप्राप्त
▪ प्रत्येक महिन्यात ११ तारखेपर्यंत प्रवेश व १५ तारखेला कोर्स सुरु
▪ एक/दोन/तीन महिन्यांच्या बॅचेसचे पर्याय ▪ कोर्स कालावधी १२० तास
▪ MS-CIT व KLiC केंद्रात कोर्सेस उपलब्ध ▪ इंग्रजी माध्यमातून प्रशिक्षण
▪ ४/५/६ क्लिक कोर्सेस पूर्ण केल्यास KLiC Diploma मिळेल
▪ ऑनलाईन वर्क असाईनमेंट्स करुन प्रत्यक्ष कमाई करिता EASY पोर्टल ही विशेष सुविधा
▪ ई-लर्निंग ▪ प्रति कोर्स फी ₹३५००/-
KLiC Courses
DTP Track
KLiC Photoshop
KLiC DTP (Adobe)
KLiC DTP(CorelDraw)
KLiC WebDesigning
Finance & Accounts Track
KLiC Tally
KLiC Excel
Programming Track
KLiC SCRATCH
IT Hardware & Networking Track
KLiC Hardware Support
KLiC Network Support
KLiC Security Support
KLiC Desktop Support
Other Courses
KLiC AutoCAD
KLiC Video Editing
KLiC PowerPoint Expert
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
www.mkcl.org/klic
अधिक माहितीसाठी आजच नजीकच्या MS-CIT केंद्राला भेट द्या!
अथवा संपर्क: 9326552525
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
www.mkcl.org/mscit

**२३-२९ जानेवारी २०१६**
वर्ष ६८ / अंक : २४

संपादक :
**विनोद शिरसाठ**

**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**

अंकनिर्मिती व्यवस्थापक व अक्षररचना :
**सुरेश माने**

मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा. लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.


Ph. : 020-24451724
Mob.: 7028257757
weeklysadhana@gmail.com
Web.weeklysadhana.com
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षांसाठी : ६०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १२०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : १८०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, खाते क्र. 60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. अंकातील छायाचित्रे इंटरनेटवरून.)

# अनुक्रम



४. **द रिअल हीरो**
संपादकीय

६. **अर्थगर्भ घोषणा**
रामचंद्र गुहा

१०. **भारतीय राजकीय चर्चा**
गोविंद तळवलकर

१४. **बावन्नकशी ए. बी. बर्धन!**
प्रवीण बर्दापूरकर

१७. **विवेकानंद आणि इस्लाम**
दत्तप्रसाद दाभोळकर

२०. **रावांचा काटेरी मुकुट 'हवाला'ने दाखवला**
पी.व्ही.आर.के.प्रसाद

२६. **गात गात गळून गेले पिकले पान**
नरेंद्र चपळगावकर

३०. **बहिणाबाईची गाणी**
आनंद करंदीकर

३३. **भारत महान कसा बनवता येईल**
अझीम प्रेमजी



## संपादकीय


# द रिअल हीरो

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत अभूतपूर्व बहुमत मिळवून सत्तेवर आलेल्या नरेंद्र मोदीप्रणित भाजप सरकारचे एक वर्ष मे २०१५ मध्ये पूर्ण झाले. तो कालखंड त्यांच्या जल्लोषाचा आणि अन्य विरोधकांच्या खचलेपणाचा होता. त्यानंतरच्या सहा महिन्यांचा कालखंड भाजप व संघपरिवाराशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असलेल्या संस्था-संघटनांच्या उन्मादाचा आणि केंद्र सरकारातील मंत्रिमहोदयांच्या व भाजप खासदारांच्या अरेरावीचा होता, पण तेच सहा महिने विरोधकांच्या दृष्टीने मात्र दुष्काळात हिरवी शेत-शिवारे दिसावीत त्याप्रमाणे होते. त्यामुळे अनेकांच्या आशेला नवे अंकुर फुटणे आणि अनेकांना खचलेपणातून सावरून लढण्यासाठी नवी उमेद मिळणे असा प्रकार घडून आला. अर्थातच, असे होणे फार आवश्यक होते, कारण नव्या राजवटीने पहिल्या वर्षात संस्थात्मक संरचनेच्या मोडतोडीला प्रारंभ केला होता आणि त्यांना अटकाव करणारे अगदीच निष्प्रभ भासत होते.

या पार्श्वभूमीवर, म्हणजे मोदी सरकारची वर्षपूर्ती झाल्यानंतर आणि तीन विवेकवाद्यांच्या हत्या व दादरी प्रकरणात महंमद अखलाखची हत्या यामुळे वातावरण तप्त झाले होते. त्यानंतर उदय प्रकाश आणि नयनतारा सहगल या हिंदी-इंग्रजीतील दोन नामवंत साहित्यिकांनी साहित्य अकादमीचे पुरस्कार परत केले. त्या साध्या कृतींचा परिणाम असा झाला की, देशभरातील विविध प्रांतांतील व विविध क्षेत्रांतील शंभराहून अधिक साहित्यिक-कलावंत-अभ्यासक-वैज्ञानिक यांनी त्यांना मिळालेले सरकारी पुरस्कार परत केले. ते सर्व इतके अचानक व अनपेक्षित घडून आले होते की, सरकारी उच्चपदस्थ आणि भाजप पदाधिकारी गांगरून गेले आणि सुचेल तशा प्रतिक्रिया देत सुटले. त्यात उपहास होता, टिंगलटवाळी होती आणि तुच्छतावादही होता आणि विशेष गंमत म्हणजे त्यात त्यांना काँग्रेस किंवा डावे पक्ष प्रणित कटही दिसत होता. त्यातून साक्षात पंतप्रधान मोदी आणि अर्थमंत्री जेटली यांचीही फसगत झाली. म्हणजे त्यांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले नव्हते आणि पुरस्कार वापसीच्या सौम्य व अगदीच निरुपद्रवी भासतील अशा कृतींच्या परिणामांचाही अंदाज आला नव्हता.

त्या पुरस्कार वापसीच्या पार्श्वभूमीवर क्लायमॅक्स ठरावे असे प्रकरण आमिर खान या अभिनेत्याच्या एका साध्या वक्तव्याने उद्‌भवले आणि सरकार व भाजप यांना पूर्णत: मौन धारण करावे लागले. इंडियन एक्स्प्रेस वृत्तसमूहाच्या कार्यक्रमात अमिर खानची मुलाखत (नोव्हेंबरमध्ये) अनंत गोएंका यांनी घेतली. त्या मुलाखतीत असहिष्णुतेच्या संदर्भात बोलताना, 'होय तशी चिंता मलाही वाटली होती', अशी कबुली आमिर खानने दिली होती. त्याच्या पत्नीला वाटलेली भीती आणि 'देशाबाहेर जावे का' असा तिच्या मनात आलेला प्रश्न, हे आमिरचे वक्तव्यही अगदीच साधे व ओघाने आलेले होते. पण पुरस्कार वापसीच्या पार्श्वभूमीवर ते साधेच वक्तव्य प्रचंड स्फोटक ठरले. त्या वक्तव्यानंतर अनेकांनी सोशल मीडियावरून आमिर व त्याच्या पत्नीला शिव्यांची लाखोली वाहिली. पण त्यात जोष नव्हता आणि जल्लोषही! त्यात होते केवळ फ्रस्ट्रेशन! शिवाय, त्या शिवराळपणाला आमिरने आणखी एका सौम्य वाक्याने उत्तर दिले ते लाजबाब होते. 'ही अशी शिवीगाळ माझी ती चिंता/काळजी बरोबर होती याचा पुरावाच आहे' हे आमिरचे वक्तव्य सत्ताधाऱ्यांना 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' सहन करण्यासारखे वाटले.

ते प्रकरण एकाच आठवड्यात शमले, नव्हे शमवले गेले असेच म्हणावे लागेल. कारण सत्ताधाऱ्यांनी त्याबाबत अजिबातच रिॲक्ट व्हायचे नाही असे ठरवले होते. ज्या अरुण जेटलींनी त्याआधी पुरस्कार वापसीच्या संदर्भात मान्यवर साहित्यिकांविषयी ब्लॉगवरून आणि पत्रकार परिषदांमधून तारे तोडले ओढले होते, त्याच अरुण जेटींच्या प्रमुख उपस्थितीत आमिरची ती मुलाखत झाली होती आणि तरीही जेटली महाशय ना त्या कार्यक्रमात काही बोलले, ना बाहेर आल्यावर, ना ब्लॉगवरून! हे खरे आहे की, त्याच दरम्यान बिहारमधील निवडणुकीचे निकाल आले होते आणि प्रचाराची प्रचंड राळ उडवूनही भाजपचा दणदणीत पराभव झाला होता. त्यामुळे भाजपनेते बॅकफुटवर गेले होते. मात्र आमिरचे ते वक्तव्य पुरस्कार वापसीच्या भरतीला आलेले उधाण होते. देशभरातील फार मोठ्या विवेकी समूहाचा




तो आवाज होता. त्यामुळे आमिरने त्याच्याही नकळत फार मोठी सामाजिक जबाबदारी पार पाडली. अर्थातच, आमिरच्या त्या एका वक्तव्याला प्राप्त झालेले ते वजन अन्य स्टार्स/ॲक्टर्स यांच्या वाट्याला आलेले नाही. मागील २५ वर्षांतील आमिर खानचे चित्रपट (अभिनय व दिग्दर्शन) आणि त्याची 'विचारी अभिनेता' ही प्रतिमा यामुळे ते वजन आहे. दक्षिण भारतात चित्रपट तारे-तारकांची ज्याप्रकारे व ज्या कारणाने 'पूजा' मांडली जाते, भक्ती केली जाते तसा प्रकार आमिर खानबाबत नाही; म्हणून त्याची वक्तव्ये अधिक दखलपात्र ठरली आणि त्यामुळे सत्ताधाऱ्यांनाही बचावात्मक पावित्र्यात जाण्यास भाग पडले.

मात्र २०१६ हे वर्ष उजाडल्यानंतर पहिल्याच आठवड्यात (केवळ चार दिवसांच्या अंतराने) दोन बातम्या येऊन धडकल्या. एक- भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या इनक्रेडिबल इंडिया (अतिथी देवो भव) या मोहिमेसाठी ब्रँड ॲम्बेसेडर आमिर खान यापुढे असणार नाही. आणि दुसरी बातमी भारत सरकारच्या वाहतूक मंत्रालयाच्या रस्तेसुरक्षा अभियानासाठी आमिर खानचा सहभाग यापुढे असणार नाही. आता दोन्ही मंत्रालयांचे पदाधिकारी-मंत्री असे सांगत आहेत की, आमिर खानबरोबरचा किंवा तो ज्या कंपनीकडून आला होता तो करार संपलेला आहे. आणि आमिर खाननेही असे म्हटले आहे की, 'सरकारच्या त्या निर्णयांचा मी आदर करतो'. त्यामुळे त्याबाबत फार वाद वाढवण्याचे कारण नाही. आमिर खानसारखा अभिनेता 'त्या' प्रकरणानंतर आपल्यासोबत वागवणे भाजप मंत्र्यांना अवघड/अडचणीचे ठरणार हे साहजिक आहे. म्हणजे हा विवेकी आयकॉन असा जनतेसमोर आणत राहणे हे सत्ताधाऱ्यांना स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे. त्यामुळे भाजप सरकारकडून असे निर्णय होणे यात अस्वाभाविक असे काही नाही. आताच्या दोनही निर्णयानंतर आमिर खानने असे म्हटले आहे की, 'मी माझ्या सामाजिक कार्यासाठी/देशाच्या सरकारच्या सेवेसाठी कसलेही मानधन घेतलेले नाही आणि देशासाठी अशी कामे यापुढेही मी विनामोबदला करीत राहीन.'

मागील पाव शतकात आमिर खानने अनेक चित्रपटांतून भूमिका केल्या आणि मोठ्या जनसमूहाचे मनोरंजन केले आहे. दोन वर्षांपूर्वी 'सत्यमेव जयते' या मालिकेची निर्मिती करून त्याने मोठेच समाजप्रबोधनही केले आहे, पण आताच्या त्या एका वक्तव्यावर ठाम राहून त्याने जो छोटासा संघर्ष केला, त्यामुळे तो 'रिअल हीरो' ठरला आहे.

कालपरवा

रामचंद्र गुहा

लालबहादूर शास्त्रींच्या पन्नासाव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने नरेंद्र मोदींनी जर 'आपण आता नवी घोषणा किंवा आद्याक्षरांचे शब्द बनविणार नाही' अशी शपथ घेतली, तर खूपच छान होईल. त्यापेक्षा आधीच बनविलेल्या दोन-तीन घोषणा निवडाव्यात; आणि असे लोक पाहून ठेवावेत की- ज्या मंत्रालयाच्या खात्यांमध्ये या घोषणांची अंमलबजावणी होऊ शकते, त्या खात्याचे त्यांना मंत्री करता येईल आणि मग यशवंतराव चव्हाण व सी.सुब्रह्मण्यम् यांना त्यांच्या पंतप्रधानांनी जे स्वातंत्र्य दिले होते, तसे त्यांना द्यावे.

# अर्थगर्भ घोषणा

आपल्या पंतप्रधानांना आद्याक्षरांचे शब्द आणि घोषणा बनवायला आवडते. 'स्वच्छ भारत', 'मेक इन इंडिया', 'बेटी पढाओ- देश बढाओ' ही काही उदाहरणे. आता नवी उदाहरणे म्हणजे स्टार्टअप इंडिया, स्टँडअप इंडिया. योजना आयोगाचे आता झाले आहे 'निती' एन-नॅशनल, आय-इन्स्टिट्युशन फॉर, टी- ट्रान्स्फॉर्मिंग, आय-इंडिया. निती आयोगाचा दुसरा भाग म्हणजे 'आयोग' हा शब्दसुद्धा काही सखोल, अर्थगर्भ शब्द सांगणारा आहे; असे दाखवता येईल. उदा. असे काही तरी कदाचित- Advanced and Analytical Yearing for Overall Growth (AAYOG). 'स्मार्ट' शहरे यातील स्मार्ट म्हणजे काय, मला माहीत नाही; पण मला हे माहीत आहे की, स्मार्ट (SMART) पोलीस म्हणजे काय, हे पंतप्रधानांनी स्वत: सांगितले आहे. Strict and Sensitive (कडक आणि संवेदनशील), Modern and Mobile (आधुनिक आणि चपळ), Alert and Accountable (सजग आणि जबाबदार), Reliable and Responsive (विश्वासू आणि प्रतिसाद देणारा), Technosavy and Trained (तंत्रकुशल आणि प्रशिक्षित).

चमकदार घोषणा तयार करण्याची आपल्या पंतप्रधानांची मनापासूनची आवड ही केवळ देशांतर्गत घोषणांपुरती मर्यादित नाही. जेव्हा आपल्या सर्वांत प्रबळ शेजाऱ्याशी असणाऱ्या संबंधांची गोष्ट येते तेव्हा INCH आणि MILES असे आद्याक्षरांचे शब्द येतात. यातील पहिला शब्द INCH हा भारत आणि चीन यांना जोडणारा आहे. (अर्थात या शब्दांत भारतमाता प्रथम- जरी चायना या शब्दातील 'सी' हा इंग्रजी मुळाक्षरांप्रमाणे आधी यायला हवा.) MILES या शब्दांत मिलेनियम म्हणजे हे सहस्रक, एक्सेप्शनल सिनर्जीशी (म्हणजे अपवादात्मक अशा अधिकतेने उत्पन्न होणाऱ्या ऊर्जेशी) जोडले आहे.

निवडणूक प्रचाराच्या काळात नरेंद्र मोदींना ज्यांचे साह्य मिळाले, ते भारतातील काही अत्यंत नवनिर्मितीक्षम शब्दलेखक होते. आता हे कळत नाही की- निवडणुकीनंतर ज्या घोषणा आणि आद्याक्षरांचे शब्द बनविण्यात आले ते त्यांनीच बनविले की पंतप्रधानांच्याच सुपीक बुद्धीतून ते आले? ते काहीही असो. आपल्याला कळते आहे ते हे की, असे शब्द पटापट येत आहेत. इतके पटापट की- आधी आलेल्या घोषणांचा, बनविलेल्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन तो नीट पचविण्यापूर्वीच नवी घोषणा, शब्द हे येऊन आदळतात.

नरेंद्र मोदी हे सातत्याने नव्या घोषणा देत आहेत. पण दहा-वीस वर्षांनंतर त्यांच्या या घोषणा किती जणांना

आठवतील? मी हे यासाठी विचारत आहे की, या पंधरवड्यात आपले भूतपूर्व पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची ५० वी पुण्यतिथी येत आहे. शास्त्रींनी केवळ एकच घोषणा दिली होती; पण ती तेव्हा दुमदुमली आणि आज ५० वर्षांनीही तिचा प्रतिध्वनी कायम आहे, ती घोषणा म्हणजे अर्थातच 'जय जवान-जय किसान'.

शास्त्रींच्या या घोषणेची पार्श्वभूमी सांगितली पाहिजे. सन १९६२ मध्ये चीनबरोबरील सीमायुद्धात भारताला मानहानीकारक पराभव पत्करावा लागला होता. असे घडण्याचे मुख्य कारण होते की, आपले सैन्य अशा युद्धासाठी तयारीत नव्हते आणि त्यांच्याजवळची युद्धसामग्री अपुरी होती. म्हणून संरक्षण योजनेच्या केंद्रस्थानी आपला सैनिक असला पाहिजे, यासाठी 'जय जवान'. त्याचप्रमाणे १९६० च्या दशकाच्या आरंभी भारताला मॉन्सूनच्या सलग झालेल्या अवकृपेला तोंड द्यावे लागले होते, त्यामुळे पिके जाऊन दुष्काळ पडला होता. देशाच्या काही भागात लोकांना उपासमारीपासून वाचवण्यासाठी पराकाष्ठा करावी लागली होती. तेव्हा पश्चिमी देशांकडून धान्य आयात करून सार्वत्रिक दुष्काळ टाळण्यात आला होता. म्हणून शास्त्रीजींच्या घोषणेचा दुसरा भाग होता- 'जय किसान'.

देशाचे संरक्षण आणि शेती यांच्यातील दुबळेपणा हा शास्त्रींनी त्यांच्या आधीचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याकडून आलेला वारसा म्हणून घेतलेला होता. नेहरूंनी संरक्षणनीतीपेक्षा विदेशनीतीला जास्त प्राधान्य दिले होते. शिवाय, अर्थकारणातही त्यांनी शेतीपेक्षा उद्योगांना अधिक प्राधान्य दिले होते.

चीनबरोबरचे युद्ध संपल्यानंतर नेहरूंनी, संरक्षणमंत्री कृष्ण मेनन अक्षम ठरले म्हणून त्यांना काढून टाकले आणि त्यांच्या जागी यशवंतराव चव्हाण यांना आणले. चव्हाण यांनी समर्थ आणि गंभीर शासनकर्ता असा आपला लौकिक निर्माण केला होता. शास्त्रींनी पंतप्रधान झाल्यानंतर चव्हाणांना त्यांच्या जागीच ठेवले होते. त्या वेळी चव्हाणांनी पश्चिमी देशांकडून आधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी करून आपल्या संरक्षणदलाला सुसज्ज केले. (कृष्ण मेनन यांनी ते सोव्हिएट युनियनकडे झुकणारे असल्याने हे टाळले होते) चव्हाणांच्या व शास्त्रींच्या अशा नव्या आणि उत्साहाने भारलेल्या धोरणांमुळे पुढे झालेल्या १९६५ च्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात देशाला मोठा फायदा झाला. आपल्या लष्कराने व हवाईदलाने उत्तम कामगिरी केली.

किसानांच्या बाबतीत शास्त्रींनी मोठा पुढाकार घेऊन जी वेगवेगळी धोरणे राबवली, ती तर याहूनही लक्षणीय होती. जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळातील कर्तबगार मंत्र्यांपैकी एक होते सी.सुब्रह्मण्यम. त्यांच्याकडे पोलाद


*संरक्षणमंत्री यशवंतराव*

खाते होते आणि नेहरूंच्या दीर्घकालीन आर्थिक नीतीसाठी ते खाते कळीचे होते. पाठोपाठ आलेल्या अवर्षणानंतर शास्त्रींनी सुब्रह्मण्यम यांना कृषिमंत्री केले होते. सुब्रह्मण्यम् यांची स्वत:ची पार्श्वभूमी शेतीनिगडित होती. शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांना समजत होते. ते प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचाच वापर केला. भारतीय कृषी अनुसंधानाच्या (आय.सी.ए.आर.) शास्त्रज्ञांना त्यांनी मोठे अधिकार दिले. त्या शास्त्रज्ञांनी हायब्रीड बियाण्यांच्या संबंधात प्रयोग केले. शास्त्रींनी आपल्या ल्यूट्येन्स या बंगल्याच्या हिरवळीवर हायब्रीडचे प्रयोग करून त्या शास्त्रज्ञांना आपल्या प्रोत्साहनाचे अतिसुंदर दर्शन घडविले. मग देशभरातील शेतकऱ्यांच्या शेतांवर हे प्रयोग केले गेले. त्यामुळे पिकांची उत्पादकता प्रचंड वाढली– खासकरून गव्हाची. त्यामुळे भारत दुष्काळापासून, तसेच पश्चिमी देशांवर अन्नधान्यासाठी अवलंबून राहण्यापासून वाचला.

शास्त्रींनी चव्हाण आणि सुब्रह्मण्यम् यांना भरघोस पाठिंबा दिला. पंतप्रधानांच्या कार्यालयाकडून होणारी सततची देखरेख थांबविली. दुसऱ्यांना अधिकार व शक्ती देण्यात शास्त्री निष्णात होते. नेहरू तसे नव्हते. (मोदीही तसे असतील असे दिसत नाही) सी.सुब्रह्मण्यम यांची निवड खास दूरदर्शी होती. सुब्रह्मण्यम् हे मंत्रिमंडळातील असे एकमेव मंत्री होते, ज्यांना स्वत:च्या कामगिरीमुळे 'भारतरत्न' देऊन गौरवांकित केले गेले. परंतु ते हे करू शकले ते पंतप्रधानांच्या पाठिंब्यामुळेच. दुर्दैवाने शास्त्री लवकर गेले. हरित क्रांतीचा लाभ १९६० च्या दशकाच्या शेवटी व १९७० च्या दशकाच्या सुरुवातीस दिसू लागला. यामुळे त्याचे श्रेय घेता आले इंदिरा गांधींना. सुदैवाने भारत–पाक युद्धावेळचे शास्त्रींचे उत्कृष्ट नेतृत्व असे होते की, ते श्रेय त्यांच्यापासून कुणीच हिरावून घेऊ शकत नाही.

या स्तंभामध्ये २०१० च्या एप्रिल महिन्यात मी म्हटले होते– ''जर शास्त्रींना आणखी पाच वर्षे मिळाली असती, तर नेहरू–गांधी घराणेशाही निर्माणच झाली नसती. संजय गांधी व राजीव गांधी अजून जिवंत असते आणि आपले वैयक्तिक जीवन व्यतीत करत राहिले असते. संजय गांधी हे एक (अयशस्वी) उद्योजक झाले असते. राजीव गांधी विमान कंपनीतून निवृत्त होऊन स्वत:च्या छायाचित्रे काढण्याच्या छंदात रमलेले निवृत्त पायलट झाले असते. शास्त्री जर जास्त जगले असते, तर सोनिया गांधी समर्पित आणि प्रेमळ अशा गृहिणी झाल्या असत्या.''

शास्त्रींचा मृत्यू लवकर झाल्यामुळे इंदिरा गांधींना आणि त्यांच्या वंशजांना काँग्रेस पक्षावरील आपली पकड मजबूत करता आली. काँग्रेस सत्तेवर असतानाच्या दीर्घ काळात त्यांना हे करता आले. भारत सरकारवरच त्यांचे वर्चस्व राहिले. आपली पाठ थोपटून घेणाऱ्या या वंशातील लोकांना वेळ होता तो एकाच भारतीयासाठी आणि तोसुद्धा त्यांच्या कुटुंबाबाहेरचा होता– महात्मा गांधी. नाही तर १९४७ नंतर भारताने केलेल्या सर्व प्रगतीचे श्रेय नेहरू, इंदिरा, राजीव आणि सोनिया यांनाच देण्यात येते. पक्षपातीपणाचे लज्जास्पद प्रदर्शन करत सरदार पटेल, राजाजी, कामराज, चव्हाण, सुब्रह्मण्यम, नरसिंह राव आणि स्वत: शास्त्री या काँग्रेसच्या रथी–महारथींकडे त्यांनी दुर्लक्षच केले.

इंदिरा व सोनिया यांनी वल्लभभाई पटेल यांचे स्मरण व वारसाच पुसून टाकला आणि त्यांच्यावर हक्क सांगण्याचा मार्ग भाजपला मोकळा करून दिला. त्यांनी लालबहादूर शास्त्रींचे नाव आणि वारसासुद्धा पुसून टाकला. आता भाजप त्यांच्यावरही हक्क सांगेल काय? तसे झाले तर ते पटेलांवर हक्क सांगण्यापेक्षाही अधिक असमर्थनीय ठरेल. कारण शास्त्रींनी संरक्षणसिद्धता व शेतीची उत्पादनक्षमता यांच्या बाबतीत जरी नेहरूंपेक्षाही खूपच निराळे कार्य केले असले, तरी त्यांनी नेहरूंचेच प्रामाणिक अनुसरण केले. ते म्हणजे, सामाजिक व धार्मिक बाबतीतील विविधतेत एकता राखण्याचे.

नेहरूंप्रमाणे शास्त्रीही भारत हा 'हिंदू पाकिस्तान' नाही व तो तसा कधीही होता कामा नये, या बाबतीत अत्याग्रही होते. सन १९६५ च्या भारत–पाक युद्धावेळी बीबीसीने म्हटले होते की, भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री हे हिंदू असल्यामुळे पाकिस्तानशी लढण्यास तयार आहेत. पश्चिमी मीडिया मेहनत न करता जगामधील अन्य भागाकडे ठोकळेबाजपणातून जसे बघायचा, त्यातूनच हे मत आले होते. शास्त्रींनी हे साफ चुकीचे मत त्वेषाने खोडून काढले. शास्त्रींनी १९६५ च्या सप्टेंबरमध्ये रामलीला मैदानावरील एका प्रचंड जाहीर सभेत भाषण केले. त्यात ते म्हणाले, ''या सभेचे अध्यक्ष मीर मुश्ताक आहेत (तेव्हा ते दिल्ली काँगेसमधील जुने–जाणते नेते होते). ज्यांचे भाषण तुम्ही ऐकले ते फ्रँक अँथनी हे ख्रिश्चन आहेत (अँथनी हे प्रसिद्ध वकील आणि सांविधानिक कायदे मंडळाचे सदस्य होते). इथे शीख आणि पारशीही आहेत. आपल्या देशातील एक अद्वितीय अशी गोष्ट ही आहे की– इथे हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, पारशी आणि सर्व धर्मांचे लोक



कृषिमंत्री सी.सुब्रह्मण्यम

आहेत. आपल्याकडे मंदिरे आहेत, मशिदी आहेत, गुरुद्वारा आहेत, चर्चेस आहेत.''

त्या सभेतील सर्वधर्मीयतेचे असे वर्णन करून शास्त्री पुढे म्हणाले, ''परंतु हे सगळे आपण राजकारणात आणत नाही, हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातला खरा फरक आहे. पाकिस्तान आपण स्वत: इस्लामिक देश असल्याचे जाहीर करतो आणि धर्माला राजकीय मुद्दा करतो. परंतु आम्हा भारतीयांना कोणताही धर्म निवडण्याचे, आचरण्याचे स्वातंत्र्य आहे. आपण आपल्या मर्जीप्रमाणे उपासना करू शकतो. जेव्हा राजकारणाचा मुद्दा येतो, तेव्हा आपल्यातील प्रत्येक जण दुसऱ्या कुणाइतकाच भारतीय असतो.''

अशी दूरदृष्टी नरेंद्र मोदींची असू शकेल का आणि ती ते अंगीकारू शकतील का? ते स्वत:ची प्रतिमा 'व्यवहारवादी सुधारक' अशी बनविण्यासाठी जोरदार प्रयत्न जरी करत असले, तरीही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक असण्याचा अंश त्यांच्यात उरतोच- ख्रिश्चन आणि मुस्लिमांविरुद्ध विषारी विधाने करणारे खासदार व मंत्र्यांचा निषेध करण्यास त्यांनी दिलेला नकार; लाक्षणिक म्हणूनसुद्धा डोक्यावर छोटी गोल टोपी (स्कल कॅप) घालण्यासाठी त्यांनी केलेली कां-कू (मात्र संपूर्ण देशातील वेगवेगळ्या जाती-जमातींची पारंपरिक शिरोभूषा दिमाखाने करणे); आपण पंतप्रधान होण्यापूर्वीच्या भारताने अनुभवलेल्या एक हजार वर्षांच्या तथाकथित गुलामगिरीचा अधूनमधून होणारा उल्लेख.

महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांच्याप्रमाणे नरेंद्र मोदींनी धार्मिक अनेकतावादी होणे, ही अपेक्षा फार झाली. हा स्तंभ अगदी छोट्या अपेक्षेने लिहिला आहे. पंतप्रधानांनी किमानपक्षी त्यांच्या सल्लागारांना अशी पूर्वसूचना द्यावी की, मनाला येईल अशा घोषणा तयार करू नका. लालबहादूर शास्त्रींच्या पन्नासाव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने नरेंद्र मोदींनी जर 'आपण आता नवी घोषणा किंवा आद्याक्षरांचे शब्द बनविणार नाही' अशी शपथ घेतली, तर खूपच छान होईल. त्यापेक्षा आधीच बनविलेल्या दोन-तीन घोषणा निवडाव्यात; आणि असे लोक पाहून ठेवावेत की- ज्या मंत्रालयाच्या खात्यांमध्ये या घोषणांची अंमलबजावणी होऊ शकते, त्या खात्याचे त्यांना मंत्री करावे आणि नंतर यशवंतराव चव्हाण आणि सी.सुब्रह्मण्यम् यांना त्यांच्या पंतप्रधानांनी जे स्वातंत्र्य दिले होते, तसे यांना द्यावे.

(अनुवाद : अशोक वाडीकर, Mob.: 9850584370)

**रामचंद्र गुहा**, बंगळुरू

परामर्श

गोविंद तळवलकर

मुसोलिनी, हिटलर आणि टोजो हे हुकूमशहा भारतीय स्वातंत्र्य मिळवण्यास मदतनीस होतील, असे सुभाषबाबूंना वाटू लागल्यावर आणि नंतर त्यांनी या त्रयींची मदत घेण्याचा मार्ग स्वीकारला असता टागोरांनी मतभेद व्यक्त केला नाही, याचा पारेख यांना विसर पडण्याचे कारण काय? गांधींनी 'बिहारमध्ये भूकंप झाला तो अस्पृश्यतेच्या पापामुळे' असे म्हटले; तेव्हा पाप-पुण्याचा भूकंपाशी सुतराम संबंध नसल्याचे टागोर, नेहरू आदींचे मत पारेख यांना मान्य आहे आणि त्यांचे म्हणणे बरोबरच आहे.

# भारतीय राजकीय चर्चा

गेल्या काही वर्षांतील भारतात झालेल्या राजकीय चर्चेचा परामर्श भिखू पारेख घेत आले आहेत. त्या लेखांवर आवश्यक ते संस्कार करून ते या संग्रहात समाविष्ट केले आहेत. पारेख हे राजकीय विषयावर अनेक वर्षे लिहीत व बोलत आले आहेत. महात्मा गांधींवरील त्यांचे पुस्तक यापूर्वी वाखाणले गेले होते. ते इंग्लंडचे निवासी असून हल या विद्यापीठाचे अनेक वर्षे ते प्रमुख होते. ब्रिटिश सरकारने त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना उमराव-लॉर्ड- बनवले असून ते लॉर्ड पारेख म्हणून ओळखले जातात.

'डिबेटिंग इंडिया' या त्यांच्या संग्रहाचे पहिले प्रकरण भारतात प्राचीन म्हणजे अगदी वेदकाळापासून वादविवाद-चर्चा यांची परंपरा कशी चालत आली याची माहिती देते. पुढे इंग्रजी राजवटीमुळे आधुनिक काळ आला. त्याच्या प्रारंभीच राजाराममोहन रॉय या बंगाली नेत्याने आधुनिक गणित, रसायन व पदार्थविज्ञान इत्यादी शास्त्रांचा आग्रह धरला. त्यानिमित्ताने झालेल्या एका वादसभेचा उल्लेख पारेख यांनी केला आहे. सन १८१६ मध्ये सुब्रमण्यम शास्त्री या विद्वानाने रॉय यांना आव्हान दिले. मग काही दिवस दोघांत वाद झाला आणि रॉय यांच्या बाजूने सभेचा कल दिसला, अशी माहिती पारेख यांनी दिली आहे.

राजकीय चर्चा आजकाल पूर्णत: नसली तरी बरीचशी लोप पावली आहे. पूर्वी राजकीय चर्चाही मुद्देसूद आणि शांतपणे होत असे. मुद्दे सोडून गुद्यांवर येण्याची प्रथा आता बोकाळत आहे. निवडणुकीच्या वेळची कोणाचीच भाषणे ऐकण्याची वा वाचण्याची तसदी घेण्याचे कारण राहिले नाही.

भारतीय घटनासभेत आपली घटना तयार होताना कशा रीतीने चर्चा होत होती याची चिकित्सा या लेखसंग्रहाच्या एका प्रकरणात आहे. ते प्रकरण सर्वांनीच लक्षात घ्यावे असे आहे. स्वतंत्र देशाची राज्यघटना बनवताना अधिकाधिक प्रतिनिधींमध्ये एकमत घडवून आणण्यावर प्रतिनिधींचा कटाक्ष होता.

घटना समितीत काँग्रेस पक्षाचे बहुमत असले तरी त्या पक्षाने दुराग्रही भूमिका घेतली नाही, तसेच विरोधी पक्षीयांनी अडवणुकीचे धोरण स्वीकारले नव्हते. चर्चा सविस्तर होत असे आणि एकमत होत नसेल, तर समिती नेमून मार्ग काढला जात होता. तसा तो काढण्यात सर्वांचाच पुढाकार होता. विविध प्रश्नांबाबत चर्चेचे स्वरूप काय होते आणि कसा मार्ग निघाला, याचे विश्लेषण पारेख यांनी केले आहे.

आपली घटना संघराज्यात्मक स्वरूपाची आहे, पण ती


पूर्णत: संघराज्यात्मक नाही. संघराज्यात्मक घटना असती, तर राज्यांना बरेच व्यापक अधिकार मिळून केंद्रसत्तेकडे अगदीच थोडे अधिकार राहिले असते. पण भारताचा इतिहास पाहता, ती व्यवस्था बजबजपुरीला आमंत्रण देणारी ठरली असती. यामुळे संघराज्यास मुरड घालण्यास मान्यता मिळाली. राज्यपातळीवरच्या नेत्यांनीही हा बदल मान्य केला, हे नमूद करण्यासारखे आहे.

राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रीय मानचिन्ह याबाबत बरीच चर्चा झाली आणि अखेरचा निर्णय सर्वानुमते झाला.

गांधी व रवींद्रनाथ टागोर हे एकमेकांस मानत होते. दोघांचे सर्व बाबतींत मतैक्य होते असे नाही; कोणत्या बाबतीत मतैक्य व कोणत्या बाबतीत मतभेद याची कल्पना लेखकाने करून दिली आहे. तथापि, गांधींच्या राजकारणाच्या बाबतीत टागोर काटेकोरपणे विचार करत, हे सांगताना पारेख यांनी म्हटले आहे की- राजकीय अधिकार, सत्ता इत्यादींबाबत गांधींनीही मर्यादेपलीकडे जाऊन अधिकार घेऊ नयेत, याबाबत टागोर जागरूक होते. पण हेच टागोर जपानमध्ये नवा सूर्य उगवल्याचे मानू लागले होते. जपानने झारच्या रशियाचा पराभव केला आणि पूर्वेकडील देशांत संपन्नतेची पहाट उगवत असल्याची भाषा बोलली जात होती. ते टागोरांना आकर्षक वाटत होते. पण वस्तुस्थिती वेगळी होती.

पुढे तर मुसोलिनीचे आमंत्रण स्वीकारून त्यांनी टीकास्त्र ओढवून घेतले. मुसोलिनी, हिटलर आणि टोजो हे हुकूमशहा भारतीय स्वातंत्र्य मिळवण्यास मदतनीस होतील, असे सुभाषबाबूंना वाटू लागल्यावर आणि नंतर त्यांनी या त्रयींची मदत घेण्याचा मार्ग स्वीकारला असता टागोरांनी मतभेद व्यक्त केला नाही, याचा पारेख यांना विसर पडण्याचे कारण काय? गांधींनी 'बिहारमध्ये भूकंप झाला तो अस्पृश्यतेच्या पापामुळे' असे म्हटले; तेव्हा पाप-पुण्याचा भूकंपाशी सुतराम संबंध नसल्याचे टागोर, नेहरू आदींचे मत पारेख यांना मान्य आहे आणि त्यांचे म्हणणे बरोबरच आहे.

डॉ.आंबेडकरांच्या विचारांची पारेख यांनी चिकित्सा करताना लिहिले आहे की, बाबासाहेब कोणत्याही व्यक्तीचे दैवतीकरण करण्याच्या विरुद्ध होते आणि हेच



*भिखू पारेख*

तत्त्व आपल्याबाबतीतही लागू करण्याचे आवाहन त्यांनी त्यांच्या अनुयायांना केले होते. तसेच प्रत्यक्ष पुरावा हा बाबासाहेबांना महत्त्वाचा वाटत असल्यामुळे अस्पृश्यतेचा पुरस्कार केल्याच्या समजुतीने 'मनुस्मृती' जाहीरपणे जाळण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता, तरी धर्मशास्त्राचा अभ्यास करताना मनुस्मृती ही अस्पृश्यतेची चाल सुरू होण्यापूर्वी लिहिल्याचा पुरावा आढळल्यावर त्यांनी ते मान्य केले, हे नमूद करण्यासारखे असल्याचे पारेख यांनी म्हटले आहे.

अस्पृश्यांना गोलमेज परिषदेनंतरच्या योजनेनुसार वेगळा मतदारसंघ मिळायचा होता. महात्मा गांधींनी मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघाविरुद्ध आंदोलन उभारले नाही, पण अस्पृश्यांच्या मतदारसंघास विरोध करण्यासाठी उपोषणाचा अवलंब केला. अखेरीस बाबासाहेबांनी आपल्यामुळे गांधींच्या जीवास धोका नको म्हणून स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद रद्द करण्यास मान्यता दिली. तथापि, मतदानासंबंधात खास तरतूद करण्याची योजना ठरवणाऱ्या गांधीप्रणीत समितीने अस्पृश्यांची फसवणूक करणारी योजना अमलात आणली आणि तिच्याविरुद्ध गांधींनी पवित्रा घेतला नाही. यासंबंधी पारेख यांनी गांधींना का दोष देऊ नये, हे समजत नाही.

डॉ.आंबेडकर यांच्या पाकिस्तानविषयक ग्रंथाला पारेख यांनी खास स्थान देऊन चर्चा केली नाही; ती करायला हवी होती, कारण आजही देशाच्या फाळणीची वारंवार चर्चा होत असताना बाबासाहेबांचे त्या ग्रंथातील विवेचन अधिक उपयुक्त व वस्तुनिष्ठ आहे.

आंबेडकरांना केंद्रसत्ता प्रबळ असायला हवी होती, असे प्रतिपादन करून पारेख यांनी त्याबद्दल वेगळा सूर काढला आहे; त्यासंबंधीही मतभेद होऊ शकतील. नेहरू व भारताचे राष्ट्रीय पातळीवरील तत्त्वज्ञान हा आणखी एका लेखाचा विषय आहे. संसदीय लोकशाही आणि देशाचे एकीकरण यांस नेहरू महत्त्व देत आले, याची उदाहरणे पारेख यांनी दिली आहेत. प्रत्येकाच्या आचार-विचारात काही दोष असतात, तसे नेहरूंच्याही होते; पण पारेख यांनी केलेल्या दोषदर्शनात गोंधळ दिसतो.


काँग्रेस हा पक्ष चोवीस तास पक्षाशी बांधून घेतलेल्या लोकांचा नाही. नेहरूंना जर समाजवादी-कल्याणकारी राजवट हवी होती, तर त्यांनी पक्षाला पूर्णवेळ बांधलेल्या कार्यकर्त्यांचा पक्ष असे स्वरूप द्यायला हवे होते; ते त्यांनी दिले नाही, असे पारेख म्हणतात. पण नेहरूंचा स्वभाव व विचारांची ठेवण या प्रकारच्या पक्षबांधणीला अनुकूल नव्हती आणि म्हणून त्यांनी असा विचारही केला नाही.

साधारणत: कोणत्याच संसदीय लोकशाहीत असे पक्ष दिसत नाहीत. आपल्याकडे कम्युनिस्ट पक्ष या प्रकारचे आहेत. पण कामगार व शेतकरी संघटनांची मदत घेणारे हे पक्ष या संघटना तत्त्वावर उभारण्यात यशस्वी झाले नाहीत. शिवाय दोन्ही कम्युनिस्ट पक्ष निवडणूक लढवतात, तेव्हा सर्वच उमेदवार पक्षाला बांधलेले असतातच असे मानणे कठीण आहे. शिवाय नेहरूंची समाजवादासंबंधीची मते नंतर बदलली, ती त्यांनी लपवून ठेवली नाहीत. अखिल भारतीय काँग्रेसच्या 'इकॉनॉमिक रिव्ह्यू' या प्रकाशनाच्या ऑगस्ट १९५८ च्या अंकात नेहरूंनी मार्क्सवादातील कालसापेक्षता नमूद करून त्यात एकसाचीपणा आणि हिंसेला दिलेले प्राधान्य यावर टीका केली होती. नंतर 'ल फिगारो' या फ्रेंच पत्रास व 'ब्लिट्झ' या करंजिया यांच्या साप्ताहिकास नेहरूंनी विस्तृत मुलाखती देऊन, समाजवादातील आर्थिक व राजकीय विचारांचे विश्लेषण करून मतभेद व्यक्त केले होते. पारेखांनी इतर अनेक बाबतींत अनेक संदर्भ दिले आहेत; याबाबत मात्र काहीच उल्लेख कसा नाही, हे समजत नाही.

मंत्र्यांबरोबर नेहरू कसे वागत होते, यासंबंधीही पारेख यांनी काटेकोर विचार केल्याचे दिसत नाही. चिंतामणराव देशमुख यांनी मुंबईबाबत नेहरू व मंत्रिमंडळ याबद्दल लोकसभेत वक्तव्य केले होते. पण नेहरूंनी त्यांची भूमिका लोकसभेत आणि पत्रव्यवहारात स्पष्ट केली होती, तीसंबंधी मतभेद असतील.

गांधींसंबंधी तीन-चार लेख आहेत. त्यातील एक विलक्षण आहे. तो म्हणजे, गांधी व ओसामा बिन लादेन यांच्यातील काल्पनिक पत्रव्यवहार. दोघेही आपली बाजू मांडून युक्तिवाद करतात, असे दाखविले आहे. गांधींनी हिटलरला पत्र पाठविले होते, त्यामुळे गांधी हयात असते तर त्यांनी ओसामालाही लिहिले नसते असे नाही. पण ते पालथ्या घड्यावर पाणी ठरले असते. हिटलरला गांधींनी पाठविलेल्या पत्राची जी गत झाली, तीच गत ओसामाला गांधींनी पत्र पाठविले असते तर झाली असती.

खिलाफतीच्या प्रश्नावरून महंमद व शौकत या अली बंधूंनी आंदोलन चालविले होते आणि यामुळे मुस्लिम समाज राष्ट्रीय आंदोलनात येईल, या अपेक्षेमुळे गांधीजींनी त्यांच्याशी सहकार्य करून खिलाफतीची चळवळ दत्तक घेतली. पण ती फोल ठरल्यावर अली बंधूंनी गांधी व



काँग्रेस यांच्याशी वैर धरले. आपण प्रथम मुस्लिम व नंतर भारताचे नागरिक असल्याचे अली बंधू जाहीरपणे म्हणू लागले.

जीनांचे मन वळवण्याची गांधींनी शिकस्त केली, पण थोडेही यश मिळाले नाही आणि जीनाप्रणीत फाळणी स्वीकारावी लागली. तेव्हा ओसामाच्या संबंधात वेगळा अनुभव आला नसता.

आपल्या संसदीय लोकशाहीची काय अवस्था आहे, यासंबंधीचे पारेख यांचे विवेचन लक्षात घेण्यासारखे आहे. ते लिहितात की, २००४ च्या निवडणुकीनंतरच्या लोकसभेत १२४ खासदारांची पूर्वपीठिका गुन्हेगारीची होती. त्यातल्या ८३ जणांवर खुनाचे आरोप होते. २००९ च्या लोकसभेत १६२ खासदारांची पूर्वपीठिका गुन्हेगारीची होती आणि ७६ जणांवर तर अत्यंत हीन गुन्ह्यांचे आरोप होते. २०१४ च्या लोकसभेत १८७ खासदारांची पूर्वपीठिका गुन्हेगारीची आहे आणि ११३ जणांवर अत्यंत हीन गुन्ह्यांचे आरोप आहेत. तसेच उत्तर प्रदेश, गोवा, उत्तराखंड या राज्यांतील अनेक आमदारांची अवस्था अशीच होती. बिहारचे मुख्यमंत्री नीतिशकुमार यांचे चारित्र्य स्वच्छ होते आणि अनेक आमदारांचे त्याउलट.

संसदेच्या अधिवेशनाचे दिवस कसे कमी–कमी होत गेले याची आकडेवारी एका प्रकरणात आहे. संसदेच्या कामाच्या प्रत्येक दिवसाला २५ कोटी रुपये खर्च येतो. असे असता, काम न करता लोकसभा व राज्यसभा बंद पाडण्यात खासदारांनी चढाओढ लावल्याचे आकडेवारीने नमूद केले आहे. तसेच लोकसभेने आठ विधेयके १७ मिनिटांत संमत केल्याची नोंद आहे. संरक्षणविषयक अर्थसंकल्प चर्चेविना संमत करण्याची प्रथा रूढ झाली आहे.

सन २००० ते २०१० या काळात विधानसभा किती दिवस भरल्या? महाराष्ट्र ४२, गुजरात ३१, आसाम २६, हरियाणा १४. उत्तर प्रदेशचे एक हिवाळी अधिवेशन वीस मिनिटे.

कोट्यवधी रुपये खर्च होऊन निवडणुका होत असताना लोकसभा आणि विधानसभा यांची ही अवस्था आहे.

**गोविंद तळवलकर**
govindtalwalkar@hotmail.com

**डिबेटिंग इंडिया :**
**एसेज ऑन इंडियन पोलिटिकल डिस्कोर्स**
लेखक : भिकू पारेख
प्रकाशन : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
पृष्ठे : ३७४, २०१५, किं. : ८९५ रुपये

अभिवादन

प्रवीण बर्दापूरकर

कम्युनिस्ट असणे म्हणजे अरसिक असणे, पोथीनिष्ठा हाच अलंकार असणे आणि राजकीय एकारलेपणाच्या तालावरच कायम गुणगुणत राहणे- हा जो महाराष्ट्रात सर्वमान्य समज होता, त्याला विदर्भात तडा दिला तो बर्धन यांनी. बर्धन अलवार कवितांचे केवळ चाहतेच नव्हते, तर त्यांना अनेक कविता मुखोद्गत- त्याही चार-पाच भाषांतल्या! त्यात सुरेश भट यांच्यासारखा कलंदर कवी मित्र असल्याने तर कवितेच्या गाभ्याला भिडण्याची सवय बर्धन यांना लागल्याचा अनुभव नागपूरकरांना अनेकदा आलेला आहे. कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा आणि मार्क्स जसा त्यांना तोंडपाठ तसाच गायत्री मंत्रही...

# बावन्नकशी ए. बी. बर्धन!

ज्येष्ठ पत्रकाराकडून ऐकलेला एक प्रसंग असा आहे- 'आयटक' या तत्कालीन बलाढ्य कामगार संघटनेच्या सर्वोच्च ख्यातकीर्त नेत्याला भेटण्यासाठी मुंबईचा एक पत्रकार नागपूरच्या कार्यालयात वेळेआधी पोहोचला, तर तिथे एक माणूस एका बाकावर शांतपणे झोपलेला होता. त्या झोपलेल्या इसमाची झोपमोड न करता तो पत्रकार 'त्या' कामगारनेत्याची वाट पाहत थांबला. काही वेळाने तो झोपलेला इसम उठला आणि त्याने त्या कार्यालयाची साफसफाई सुरू केली. थोड्या वेळाने पत्रकाराने त्या इसमाला सांगितले की, तो ए.बी.बर्धन यांना भेटायला आला आहे. साफसफाई करणाऱ्या त्या इसमाने खिशातला रूमाल काढला, हात पुसले आणि स्वत:ची ओळख करून दिली, ''मी बर्धन. बोला, काय काम होतं आपलं? कोण आपण?...'' आणि त्या पत्रकाराला चक्करच आली!

गेली ७५ पेक्षा जास्त वर्षे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा झेंडा घेऊन राजकारणात असलेल्या अर्धेंद्रू भूषण बर्धन नावाच्या आणि आता वयाच्या नव्वदीनंतर जगाला आखरी सलाम ठोकणाऱ्या माणसाची जीवनकथा अशी बावन्नकशी शुद्धतेची आहे, स्वच्छ चारित्र्याची आहे, आजच्या वातावरणात अविश्वसनीय वाटेल अशा अव्यभिचारी राजकीय निष्ठेची आहे. विविधतेत एकता हे जे आपल्या देशाचे वर्णन केले जाते, त्याची साक्ष सर्वार्थाने पटवणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. दि. २५ सप्टेंबर १९२५ रोजी तेव्हाच्या पूर्व बंगालमध्ये (आताचा बांगलादेश) जन्मलेल्या अर्धेन्द्रूने १९४० मध्ये ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनच्या विद्यार्थी चळवळीत प्रवेश केला. तिथे त्यांची ओळख कम्युनिझमशी झाली आणि वयाच्या १५ व्या वर्षी- १९४१ मध्ये- पक्षात त्यांनी पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून प्रवेश केला आणि अखेरचा श्वासही कम्युनिस्ट म्हणूनच घेतला. पक्षाच्या सर्वोच्च महासचिवपदाची जबाबदारी सलग सोळा वर्षे सांभाळल्यानंतर बर्धन यांनी राजकारणाचा मुख्य प्रवाह सोडला. त्यांनी हे पद सोडावे असे कोणी सुचवले नाही, तशी कोणी मागणी केली नाही, त्यांच्यावर त्या पदाचा गैरवापर केल्याचा कोणताही आरोप झालेला नाही किंवा वयोमानपरत्वे त्यांच्यातला उत्साह कमी झाल्याची कोणतीही लक्षणे नव्हती. एवढेच नाही तर भारतीय राजकारण यूपीए आणि एनडीएभोवती केंद्रित झालेले असले तरी ते अंतिम राजकीय सत्य नाही, अशी भूमिका ठणकावून सांगण्याइतकी त्यांची बुद्धी शेवटपर्यंत तेज असल्याचा अनुभव प्रस्तुत लेखकाने घेतला आहे. विवेकानंद ही कोणा एकाची मक्तेदारी नाही, हे परखडपणे सांगण्याइतका खमकेपणा तेव्हाही (म्हणजे वयाच्या



नव्वदीच्या उंबरठ्यावर!) शाबूत होता, तरीही, बर्धन यांनी पक्षातील सर्वोच्च पदाचा त्याग केला.

बंगाल जन्मभूमी असली तरी ए.बी.बर्धन अस्सल नागपूरकर झालेले होते. सहा फुटांची सणसणीत उंची, सावळा वर्ण, मध्यम बांधा, डोईवरचे केस मागे वळवलेले आणि काळेभोर बोलके डोळे अशी शरीरयष्टी असलेले बर्धन हे कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केल्यावर नागपुरात आले आणि पुढची पन्नास वर्षे ते नागपूरकर म्हणून वावरले, नागपूरच्या मातीशी एकरूप झाले, विदर्भाच्या जनजीवनाचा अभिन्न अंग झाले. मराठी, बंगाली, इंग्रजी, उर्दू आणि हिंदी अशा पाच भाषा बर्धन यांना अस्खलित येत असत. इतक्या अस्खलित की– बर्धन यांची मातृभाषा कोणती, असा संभ्रम निर्माण व्हावा. या बहुभाषकतेमुळे बर्धन यांची पाळेमुळे जनमानसात खोलवर रुजत गेली. माणूस व्यक्त होतो तो त्याच्या मातृभाषेतूनच. पाच मातृभाषांचे धनी असलेले बर्धन या भूमीतल्या सर्वसामान्यांचे नेते झाले. अर्ध्या बाह्यांचा बुशकोट किंवा पूर्ण बाह्यांचा सदरा– तोही हाताच्या कोपरापर्यंत दुमडलेल्या बर्धन यांचे वक्तृत्व एकदा सुरू झाले की, जणू भाषेचा प्रपात कोसळत असे. सर्वसामान्य माणसाच्या काळजाला हात घालण्याची किमया त्यांच्या वक्तृत्वात होती. वक्तृत्वाचा हा प्रपात प्रसंगी शीतल, हळवा, कोमल; तर प्रसंगी कमालीचा तेज व तप्त होऊन कोसळत असे. कम्युनिस्ट असणे म्हणजे अरसिक असणे, पोथीनिष्ठा हाच अलंकार असणे आणि राजकीय एकारलेपणाच्या तालावरच कायम गुणगुणत राहणे– हा जो महाराष्ट्रात सर्वमान्य समज होता, त्याला विदर्भात तडा दिला तो बर्धन यांनी. बर्धन अलवार कवितांचे केवळ चाहतेच नव्हते, तर त्यांना अनेक कविता मुखोद्गत– त्याही चार–पाच भाषांतल्या! त्यात सुरेश भट यांच्यासारखा कलंदर कवी मित्र असल्याने तर कवितेच्या गाभ्याला भिडण्याची सवय बर्धन यांना लागल्याचा अनुभव नागपूरकरांना अनेकदा आलेला आहे. कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा आणि मार्क्स जसा त्यांना तोंडपाठ तसाच गायत्री मंत्रही... आणि आणखी पुढचे पाऊल म्हणजे गायत्री मंत्रातील विज्ञान तसेच शोषणमुक्ती बर्धन आपल्याला पटवून देणार! मराठीच्या एखाद्या प्राध्यापकाला ज्ञानेश्वरी काय उमगली असेल, त्यापेक्षा जास्त बर्धन यांची ज्ञानेश्वरीवर हुकूमत होती. विवेकानंद जसे आदरणीय तसेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे साहित्य आणि क्रांतिकारक म्हणून केलेल्या कामगिरीचा बर्धन यांना अभिमान. स्वातंत्र्यलढ्यातील सावरकर यांचे योगदान या विषयावर बर्धन यांनी दिलेली दोन व्याख्याने आजही नागपूरकरांच्या स्मरणात आहेत.

राजकीय भूमिका घराच्या उंबरठ्याबाहेर ठेवण्याचे बर्धन

यांचे कसबही कायमच विलक्षण घरंदाज राहिले. त्यामुळे त्यांना विरोधक केवळ विचाराने होते, मनाने नाही. गेल्या पिढीतील आधी जनसंघ आणि नंतर भारतीय जनता पक्षाच्या शीर्षस्थ नेत्या सुमतीताई सुकळीकर या ए.बी. बर्धन यांच्यासाठी त्यांच्या थोरल्या भगिनीसारख्या. या दोघांनी परस्परांविरोधात निवडणुकाही लढवल्या, पण 'राखी'चं त्यांचं नातं सुमतीताई सुकळीकर यांच्याशी कायम राहिलं. सुमतीबाई यांचे 'सुमतीताई' असे नामकरणही बर्धन यांचंच.

एक कामगार नेता, आमदार व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा राष्ट्रीय नेता असा बर्धन यांचा प्रवास नागपूरकरांनी जवळून बघितला आणि महाराष्ट्राने तो अनुभवला. बंगालमधून आलेल्या या माणसाची संयुक्त महाराष्ट्रासाठी असलेली व्याकुळता आणि आंदोलनाच्या आघाडीवरची आक्रमकता नागपूरकरांनी बघितली. त्यांच्या जगण्याच्या काळातच काळात देशात मोजकी दोन-तीन राज्ये वगळता कम्युनिस्ट कायम प्रभावी राहिले नाहीत- किंबहुना, कम्युनिस्ट सत्ता असलेल्या राज्यांचा अपवाद वगळता या विचाराचा उत्तरोत्तर संकोचच होत गेला. अशा प्रतिकूल काळात स्वत: निराश न होता, कार्यकर्त्यांचे मनोबल आणि आशावाद टिकवून ठेवणे काही सोपे काम नसते. नेतृत्वाच्या कसोटीचा हा कधीही न संपणारा क्षण असतो. बर्धन यांची नेतृत्वशैली आव्हानांच्या सर्व कसोट्यांना पुरून उरली. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे जो राजकीय विचार स्वीकारला, त्यावरची बर्धन यांची निष्ठा एकाच वेळी विलक्षण तेजस्वी आणि सालस अशी दुहेरी होती. स्वभाव टोकाचा विनातडजोडवादी होता, तसेच उक्ती आणि कृतीत कोणतेच अंतर नव्हते. मानवी समतेचे केवळ गीतच या राजकीय विचारातून केवळ गाता येत नाही; तर त्यातून समानता प्रत्यक्षात आणणारी राज्यव्यवस्था अंमलात येऊ शकते, हा दुर्दम्य आशावाद त्यांच्या मनात कायम तेवत होता आणि त्यासाठी (केवळ त्यासाठीच) जगण्याचे त्यांचे आत्मबळ प्रखर होते.

सन १९५७ चा एक अपवाद वगळता पक्षाने त्यांना विधीमंडळ किंवा संसदेच्या कोणत्याच सभागृहात सन्मानाने बसण्याची संधी दिली नाही. खरे तर, त्यांची अव्यभिचारी पक्षनिष्ठा लक्षात घेता, पक्षाने त्यांना राज्यसभा किंवा गेला बाजार विधानपरिषदेवर तरी संधी द्यायला हवी, असे त्यांच्या हितचिंतकांना तीव्रतेने वाटत असे; पण तसे काही घडले नाही. प्रखर आत्मबळामुळेच की काय, बर्धन यांच्या मनात मात्र त्याबद्दल कोणतीही कटुता नव्हती. करिअर म्हणून राजकारणाकडे बघण्याच्या आणि राजकारण हे धनप्राप्तीचेच साधन आहे असे मानण्याच्या आजच्या जमान्यात बर्धन हे अनेकांना कालबाह्य वाटू शकतील. कारण पद, सन्मान आणि धन यांच्यापासून बर्धन कायम लांब राहिले. राजकारणातले पद, सन्मान आणि धन निकटस्थ होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या लांड्यालबाड्या बर्धन यांच्या रक्तातच नव्हत्या. त्यामुळेच बर्धन यांच्या 'राजकीय रक्ताच्या' लाल रंगात आयुष्यभर कोणतीही भेसळ झाली नाही; तो रंग अस्सल राहिला. राजकीय निष्ठांचा बाजार मांडण्याच्या आजच्या काळात असे अस्सल असणे खूपच दुर्मिळ असते. असा दुर्मिळ नेकीचा राजकारणी होणे ए.बी. बर्धन यांना जमले. त्यांच्या या कफल्लक असण्यातच त्यांचे वैभव व चारित्र्य दडलेले आहे आणि तीच त्यांची आयुष्याची पुंजी होती.

पक्षाचे शीर्षस्थ नेतृत्व १६ वर्षे करून आणि राजकारणी म्हणून अतिशय शुभ्रसुवर्ण प्रतिमा संपादन करून उजळ माथ्याने बर्धन यांनी हे सर्वोच्च पद सोडले. तेव्हापासून ते पक्षाच्या दिल्लीतील अजय भवनात एखाद्या व्रतस्थासारखे वास्तव्य करून होते. त्यांच्या अतिशय साध्या खोलीत त्यांच्याशी गप्पा मारताना मराठी साहित्य आणि संस्कृतीशी असणारी त्यांची नाळ कायम असल्याचे जाणवत असे. एकदा दिल्लीतील सहकारी विकास झाडे आणि मी बर्धन यांना भेटायला गेलो. गप्पांच्या ओघात आजच्या राजकारणाचा विषय आला; तेव्हा बर्धन म्हणाले, ''देशाची परिस्थिती केवळ वाईटच नाही, तर इतकी चिंताजनक होईल अशी कधी कल्पनाही केलेली नव्हती. आज राजकारणात मूल्य नाही तर पैसा महत्त्वाचा झाला आहे; पण माझा जनतेवर विश्वास आहे . आज नाही उद्या या देशातील जनता ही परिस्थिती बदलून टाकेल, अशी मला खात्री आहे.'' वयाच्या नव्वदीच्या उंबरठ्यावरही त्यांचा आशावाद कायम होता आणि त्यांच्या मनात विचार घोळत होता तो केवळ देशाचा.

वयाची पंचाहत्तरी गाठली तेव्हा झालेल्या सर्वपक्षीय सत्कारात 'भारतीय राजकारणातले भीष्माचार्य' असा बर्धन यांचा गौरवाने उल्लेख केला गेला; तेव्हा हातांच्या दोन्ही करांनी कानांची पाळी नम्रपणे पकडत भीष्माचार्य हा सन्मान स्वीकारणारे हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व आता काळाच्या पडद्याआड गेले आहे

**प्रवीण बर्दापूरकर**
Mob.: 9822055799 / 9011557099

युवकदिन विशेष

दत्तप्रसाद दाभोळकर

सर्वधर्म परिषदेपूर्वी विवेकानंदांनी अमेरिकेतील शेवटचे भाषण 'अमेरिकन सोशल सायन्सेस'च्या वार्षिक अधिवेशनात दिले. त्याचे शीर्षक आहे, 'हिंदुस्थानच्या इतिहासातील इस्लामचे योगदान'. या भाषणाची प्रत उपलब्ध नाही. मात्र मानवेंद्रनाथ रॉय यांनी याच शीर्षकाचे इंग्रजी पुस्तक लिहिलेय आणि ते त्या भाषणातील मुद्यांवर आधारित आहे, असे काही जण मानतात. १० ऑक्टोबर १८९७ रोजी अखंडानंदांना पत्र पाठवून त्यांनी सांगितले, 'आपल्या मठात ब्राह्मण, दलित यांच्याबरोबर मुसलमान आणि ख्रिश्चन मुलांनाही प्रवेश दिला पाहिजे.

# विवेकानंद आणि इस्लाम

विवेकानंदांनी इस्लामचा गौरव केलाय. आज जगाला सर्वधर्म समभाव व सर्वधर्म सद्‌भाव याची गरज आहे, हे सांगितले आणि भारताचा अभ्युदय करावयाचा असेल, तर हिंदू-मुसलमान सहकार्य नव्हे तर हिंदू-मुसलमान समन्वय हवा अन् तो कसा करता येईल, हे सांगितले. ही सारीच मांडणी नेमकी आणि भेदक आहे- अनेकांना आजही ती कदाचित दाहक वाटेल.

प्रश्न सोडवायचा असेल; तर प्रश्न जिथून निर्माण झाला, तिथून सुरुवात करावी लागते. विवेकानंदांनी सांगितले, ''या देशातील धर्मांतरे ख्रिश्चन आणि मुसलमान यांनी केलेल्या अत्याचारामुळे नव्हेत, तर उच्चवर्णीयांनी केलेल्या अत्याचारामुळे झालीत. ते आपले अभागी भाऊ आहेत आणि दलितांबद्दल आपल्या मनात जी कणव आहे, ती धर्मांतरित मुसलमान व ख्रिश्चन यांच्याबद्दलही असावयास हवी.'' नोव्हेंबर १८९४ मध्ये दिवाणजी (म्हणजे हरिदास बिहारीलाल देसाई) यांना पत्र पाठवून त्यांनी सांगितले, 'भारतात गरिबांमधून इतक्या मोठ्या प्रमाणावर लोक मुसलमान झालेले का आढळतात? केवळ तलवारीच्या जोरावर त्यांचे असे धर्मांतर घडवून आणले गेले, असे म्हणणे म्हणजे महामूर्खपणाच होय. त्यांनी धर्मांतर केले जमीनदारांच्या कचाट्यातून सुटण्यासाठी, पुरोहितांच्या हातून मुक्त होण्यासाठी, स्वाधीनतेसाठी. म्हणूनच बहुसंख्य जमीनदार असलेल्या बंगालमध्ये मुसलमान किसानांची संख्या हिंदू किसानांपेक्षा अधिक आढळून येते. या लाखो अवनत व दलित नर-नारींच्या उद्धाराची चिंता आहे कुणाला?' असेच विचार त्यांनी २० सप्टेंबर १८९२ रोजी खेत्रीनिवासी पंडित शंकरलाल शर्मा यांना पत्र पाठवून सांगितले. त्या पत्रात ते म्हणतात, 'ज्या ठिकाणी ब्राह्मणच संपूर्ण जमिनीचे मालक असून, तेथील साऱ्या स्त्रिया- एवढेच नव्हे, तर राजवंशातील स्त्रियादेखील- ब्राह्मणांची उपपत्नी होऊन राहण्यात मोठा सन्मान मानतात. जिथे पुरोहितांचा अत्याचार भारतात सर्वांपेक्षा जास्त आढळतो, त्या त्रावणकोर प्रांतात जवळजवळ एकचतुर्थांश लोक ख्रिस्ती बनले आहेत आणि मी त्यांना दोष का देऊ?' खरं तर विवेकानंद जे सांगतात, त्याची अंधुक किंवा एकांगी जाणीव रामदासांनाही आहे. दासबोधात 'कित्येक तुरुक होती आपुल्या इच्छेने' याची ते नोंद करतात. मात्र यामागच्या कारणांचा शोध आणि बोध घेत नाहीत. याउलट, धर्मांतरामागची ही कारणे सांगताना धर्म बदलूनही दलितांची स्थिती सुधारली नाही, सुधारणार नाही व याची दाहक जाणीव विवेकानंदांना आहे. दि.२९ मार्च १८९४ रोजी अमेरिकेतून केरळचे धर्मगुरू रेव्हरंड

आर.ह्यूम यांना पत्र पाठवून त्यांनी कळविले, 'तू हिंदूंना कॅथॉलिक केलेले नाहीस; त्यांना आपापल्या जातीत कॅथॉलिक केले आहेस.'

धर्मांतरित दलितांची स्थिती सुधारावयाची असेल, तर घरवापसीचा कार्यक्रम विवेकानंद सांगत नाहीत; कारण घरवापसीनंतर ते पुन्हा त्याच पददलित जातीत प्रवेश करणार आहेत. घरवापसी न करता धर्मा-धर्मातील आपले विशेषाधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी निर्माण करण्यात येणारी तेढ थांबवली पाहिजे हे त्यांनी ओळखले होते. त्यांनी पहिली गोष्ट ही सांगितली की, इतर धर्मीयांवर खोटे आरोप करू नका. स्वत:ला तपासा. हे विवेकानंद फार ज्वालाग्रही शब्दांत सांगतात. वराहनगर मठातील त्यांचा मित्र राखाल (जे पुढे ब्रह्मानंद झाले) यांना १८९५ मध्ये पत्र पाठवून ते सांगतात, ''ढोंगी साधू-संन्यासी व विविक्षित वर्गातील ब्राह्मण यांनी या देशाला विपत्तीच्या खाईत लोटले आहे. त्यांचे मोठ-मोठे मठ आहेत, तिथे चमचमीत भोजन दिले जाते; तर दुसरीकडे देशातील एक-चतुर्थांश माणसे भुकेने तडफडून मरताहेत. आठ वर्षांच्या मुलीचा तीस वर्षांच्या घोडनवऱ्याशी विवाह होतोय आणि याला विरोध केला तर 'तुम्ही आमचा धर्म बुडवत आहात', अशी ओरड केली जाते. मुलगी वयात येण्यापूर्वी तिचे लग्न करणाऱ्या लोकांना कसला आलाय धर्म? काही जण म्हणतात, 'मुसलमान राजवटीत मुलींचे रक्षण करण्यासाठी बालविवाह सुरू केले.' अरे, किती खोटे बोलाल? गुह्यसूत्रे, सर्व ब्राह्मणग्रंथ यांनी बालविवाहाचा आदेश दिलेला आहे आणि त्यांच्या खरेपणाबद्दल सर्व भाष्यकारांनी ग्वाही दिली आहे.''

विवेकानंद इथेच थांबत नाहीत. 'इस्लाममधील चांगल्या गोष्टींचे मोकळ्या मनाने स्वागत करा' म्हणून सांगतात. १९ नोव्हेंबर १८९४ रोजी न्यूयॉर्कहून आपल्या सर्व शिष्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात ते सांगतात, 'मुसलमानांनी हिंदूंवर विजय मिळवले. कसे शक्य झाले ते मुसलमानांना? भौतिक सभ्यतेबाबतचे हिंदूंचे घोर अज्ञान हे त्याचे कारण आहे. शिंप्यांनी शिवलेले कपडे घालायलासुद्धा हिंदूंना कुणी शिकवले असेल, तर ते मुसलमानांनी! रस्त्यातल्या धुळीने माखलेले अन्न खाण्यापेक्षा स्वच्छ रीतीने अन्न कसे खावे हे जर हिंदू लोक मुसलमानांकडून शिकले असते, तर किती बरे झाले असते!'

मात्र हे सारे सांगत असतानाच हिंदू-मुसलमान दोघेही एकमेकांपासून शिकताहेत, ही स्वागतार्ह गोष्ट आहे आणि त्याच वेळी या दोन्ही धर्मांनी धर्मग्रंथांच्या पलीकडे गेले पाहिजे, हे त्यांनी सांगितले. हे सहज शक्य आहे, कारण धर्म ग्रंथांवर अवलंबून नाहीत, तर ग्रंथ हे धर्मावर अवलंबून आहेत. धर्मातील मूलभूत शाश्वत तत्त्वे सांगण्यासाठी ग्रंथ निर्माण झाले. ते जर काळाच्या एका चौकटीत बंदिस्त असतील; तर धर्मातील मूलभूत शाश्वत तत्त्वे आजच्या काळात, आजच्या संदर्भात सांगण्यासाठी त्यांनी बदलले पाहिजेत. दि.१० जून १८९८ रोजी अलमोरा येथून सर्फराज मोहमद हुसेन यांना पत्र पाठवून त्यांनी कळविले, 'आमच्या वेदांतातील सिद्धांत कितीही सूक्ष्म आणि सुंदर असले, तरी समतेचा संदेश सर्वप्रथम व्यवहारात आणला तो इस्लामनेच. मात्र जिथे वेद नाहीत, कुराण नाही व बायबलही नाही, अशा ठिकाणी आपल्याला मानवजातीला घेऊन जायचंय आणि हे काम आपणाला वेद, कुराण व बायबल यांचा आधार घेऊनच करावे लागेल.'

'धर्मग्रंथांचा आधार घेऊन आजच्या काळाला सुसंगत अशा प्रकारे आपणाला धर्मग्रंथांच्या बाहेर जावे लागेल. यासाठी माझा देश हा पथदर्शक आहे', असा त्यांचा विश्वास आहे. इस्लामपासून समतेचा संदेश हिंदू धर्म शिकतोय- हे सांगत असतानाच, 'भारताचा भावी काळ' या विषयावर भाषण देत असताना, 'इंग्रजांचे व मुसलमानांचे शासन जातिव्यवस्थेची तीव्रता कमी करण्यास उपयोगी पडले' याचे त्यांनी स्मरण करून दिले. मात्र त्याच वेळी हा एकमार्गी प्रवास नाही तर दोन धर्मांचे सुखद असे आदान-प्रदान भारतात झालेय, हे त्यांनी अमेरिकेत सांगितले. बोस्टन येथील 'ट्वेंटिएथ सेंच्युरी हॉल'मध्ये झालेल्या चर्चेत त्यांनी सांगितले, ''वेदांतातील धार्मिक उदारतेचा इस्लाम धर्मावर भारतात बराच प्रभाव पडला आहे. इतर देशांतील इस्लाम धर्मापेक्षा भारतातील इस्लाम धर्म अगदी वेगळा आहे. दुसऱ्या देशातील मुसलमान भारतात येऊन 'काय तुम्ही या काफिरांबरोबर राहता?' अशी आपल्या धर्मबांधवांना चिथावणी देतात, तेव्हाच काय ते उत्तेजित होऊन दंगे करतात.''

म्हणजे भारतात हिंदू-मुसलमान सद्भाव हवा असेल, तर जगभर ख्रिश्चन-इस्लाम यांचे झगडे होऊन त्याचे पडसाद भारतात उमटणार नाहीत, हे पाहिले पाहिजे. दोघांना एकमेकांची शक्तिस्थाने आणि मर्मस्थाने समजावून दिली पाहिजेत, याचे भान विवेकानंदांना आहे. ३ ऑगस्ट १८९५ रोजी अमेरिकेत 'हॉल ऑफ पीस'मध्ये विवेकानंदांनी महंमद पैगंबरांवर भाषण दिले. मिसेस ओली

बूल त्या वेळी उपस्थित होत्या. त्यांनी लिहिलेय, 'हा विलक्षण अनुभव होता. ख्रिस्तीधर्मी श्रोत्यांसमोर एका हिंदूने महंमद पैगंबरांचे मोठेपण समजावून दिले. विवेकानंदांनी मुख्य धडा शिकविला तो हा की, सर्व धर्मीयांच्या प्रेषितांचा आपण सन्मान केला पाहिजे. एक प्रेषित या नात्याने महंमद पैगंबरांनी आपणाला काय दिले, हे त्यांनी श्रोत्यांना पटेल अशा शब्दांत समजावून दिले.' मृत्यूपूर्वी केवळ दोन वर्षे आधी सॅन फ्रॅन्सिस्को उपनगर क्षेत्रात २५ मार्च १९०० या दिवशी महंमद पैगंबरांचे मोठेपण समजावून देत त्यांनी असेच भाषण दिले.

अमेरिकेतील एका प्रमुख चर्चमध्ये ख्रिश्चन धर्मगुरूंसमोर भाषण देताना विवेकानंद म्हणाले, ''तुम्ही इस्लामचा सर्वाधिक द्वेष करता. तुमच्या दोन धर्मांच्या संघर्षातून एक महाभयानक प्रलय होईल. इतर धर्मांना नकळत त्यात सामील व्हावे लागेल. एकमेकांना समजावून घ्या. एखादा निग्रो गुलाम मुसलमान झाला, तर तो इराणच्या बादशहाचा जावई होऊ शकत होता. मात्र युरोप आणि अमेरिकेत मी भाषणे देत हिंडलोय. तुमच्या एकाही चर्चमध्ये धर्मांतरित निग्रो ख्रिश्चन का दिसत नाही? आपण एकमेकांना समजावून घेऊन आदान-प्रदान करणार आहोत, की झापडबंद वाटचाल करणार आहोत?'' १७ नोव्हेंबर १८९७ रोजी लंडन येथे भाषण देताना त्यांनी ते नेमक्या भेदक शब्दांत मांडले. ते म्हणाले, ''खरी अडचण समजावून घ्या. बायबल आणि कुराण यांच्यामध्ये पडून कोणी निवाडा करू शकणार नाही. कारण भांडणच मुळी या दोघांचे आहे. तिसरा कोणता धर्म यात पडला, तर एवढेच होईल की, भांडण आता तिघांचे होईल! हे भांडण मिटवायला सर्वसंमत अशी एखादी शक्ती हवी आणि बुद्धीपेक्षा सर्वसंमत अशी कोणती गोष्ट असू शकेल? धर्माचे म्हणणे आपण बुद्धीच्या निकषावर पारखूनच घेतले पाहिजे.''



मात्र हे सारे सांगत असतानाच आपला देश त्यांच्या कायम लक्षात आहे. सर्वधर्म परिषदेपूर्वी विवेकानंदांनी अमेरिकेतील शेवटचे भाषण 'अमेरिकन सोशल सायन्सेस'च्या वार्षिक अधिवेशनात दिले. त्याचे शीर्षक आहे, 'हिंदुस्थानच्या इतिहासातील इस्लामचे योगदान'. या भाषणाची प्रत उपलब्ध नाही. मात्र मानवेंद्रनाथ रॉय यांनी याच शीर्षकाचे इंग्रजी पुस्तक लिहिलेय आणि ते त्या भाषणातील मुद्द्यांवर आधारित आहे, असे काही जण मानतात. मात्र, हिंदू-मुसलमान प्रश्नांची केवळ वैचारिक मांडणी करून विवेकानंद थांबत नाहीत. १० ऑक्टोबर १८९७ रोजी अखंडानंदांना पत्र पाठवून त्यांनी सांगितले, 'आपल्या मठात ब्राह्मण, दलित यांच्याबरोबर मुसलमान आणि ख्रिश्चन मुलांनाही प्रवेश दिला पाहिजे. ही सारी मुले एकत्र बसून जेवण करतील. मात्र त्यांच्या जुन्या सवयीप्रमाणे त्यांना थोडे वेगवेगळे अन्न द्या.' आणि आयुष्याच्या शेवटच्या कालखंडात खूप आजारी असतानाही, अंगात ताप असतानाही ते अंबाल्याला गेले. 'आर्यसमाजी व मुसलमान यांच्यातला दुरावा कमी करा', म्हणून त्यांनी दोन्ही बाजूच्या नेत्यांना आवर्जून सांगितले आणि अंबाल्यात एक हिंदू-मुसलमान प्रशाला होती, त्या शाळेला मुद्दाम भेट दिली.

**डॉ. दत्तप्रसाद दाभोलकर**
dabholkard@dataone.in
Mob.: 9822503656

**नेमके काय झाले**

पी.व्ही.आर.के.प्रसाद

एका बाजूस आपली सदसद्विवेकबुद्धी आणि दुसऱ्या बाजूस पक्षाचे हित- यापैकी कशाला प्राधान्य द्यायचे, या विचारामध्ये पीव्ही गढले होते. ते काही काळ शांत राहिले. जसे मी त्यांच्या द्विधा मन:स्थितीविषयी कल्पना करू लागलो, तसे मला काटेरी मुकुट म्हणजे काय असते याचा अर्थ लक्षात येऊ लागला. पीव्ही उठले आणि आत जाता-जाता मला म्हणाले, ''मी पक्षाचे हित व्यक्तीपेक्षा जास्त महत्त्वाचे मानतो. आता मला न्यायसंस्थेशी संघर्ष, तोसुद्धा राजकीय भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून नको आहे.

# रावांचा काटेरी मुकुट 'हवाला'ने दाखवला

पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव यांच्याबरोबर काम करतानाच्या माझ्या कारकिर्दीत पहिल्यांदाच मी 'उग्र नरसिंह' (पुराणकथांतील सिंह आणि मानव यांच्या संयोगातून बनलेला उग्र देव)च्या छटा त्यांच्या चेहऱ्यावर पाहत होतो. हवाला प्रकरणावरील बातम्या आणि सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली जनहित याचिका यामुळे ते अस्वस्थ झाले होते. त्यांच्यासमोर सीबीआयचे प्रमुख के.विजय रामा राव (सध्या तेलुगू देसम पक्षाचे नेते) आणि महसूल विभागाचे सचिव शिवरामन यांच्यासोबत मी बसलो होतो. नरसिंह रावांनी त्यांना विचारले, ''मी जे तुम्हाला सांगितले होते, ते तुम्ही न्यायाधीशांना सांगितले का?'' त्यावर ते दोघे उत्तरले, ''हो सर, आम्ही त्यांना सर्व गोष्टी अतिशय सविस्तरपणे समजावल्या. त्यांना अगदी स्पष्टपणे सांगितले की, पुरेसा पुरावा नसताना सीबीआयने राजकीय नेत्यांवर केसेस दाखल करणे आणि त्यांची चौकशी करणे योग्य नव्हे. आम्ही त्यांना असेही म्हणालो की, पुरावा असो किंवा नसो; राजकीय नेत्यांवर केस दाखल करणे आणि त्यांची चौकशी करणे यासाठी सरकारची परवानगी आवश्यक आहे.'' त्यांचे हे उत्तर ऐकून पी.व्ही.नरसिंह राव म्हणाले, ''थोडासुद्धा पुरावा नसताना इतक्या साऱ्या वरिष्ठ राजकीय नेत्यांची चौकशी करायला सरकार कशी काय परवानगी देईल?'' यावर शिवरामन पीव्हींना म्हणाले, ''न्यायाधीश जे.एस.वर्मा आमचे म्हणणे ऐकून घ्यायला तयार नाहीत; उलट त्यांनी आम्हाला स्पष्टपणे असे विचारले की, इतक्या साऱ्या राजकीय नेत्यांना वाचवण्यासाठी तुम्ही 'हवाला' प्रकरणाची चौकशी करीत नाही आहात की काय? उद्यापर्यंत खटल्याचे कामकाज तहकूब करण्यात आले आहे.''

पंतप्रधान नरसिंह रावांच्या बोलण्याचा स्वर आणि त्याचा कल यातून त्यांचा राग व्यक्त होत होता. ''कोणताही पुरावा नसताना सर्वोच्च न्यायालय आपल्याला केसेस दाखल करायला कसे भाग पाडू शकते? कोणताही पुरावा नाही, हे पूर्ण माहीत असूनसुद्धा मी केसेस दाखल करायला कशी काय परवानगी देऊ शकतो? न्यायालयाचे श्रेष्ठत्व जपण्यासाठी आपण वरिष्ठ राजकीय नेत्यांची चौकशी करायची? जर मी खटले दाखल करायला परवानगी नाकारली, तर न्यायालय स्वतःहून एखादी चौकशी समिती नेमणार काय? न्यायालय उघडपणे जनतेसमोर जास्त ताकदवान कोण आहे हे दाखवू पाहत आहे. मी न्यायालयाच्या दबावाला बळी पडावे काय? जर पुरेसा पुरावा असतानासुद्धा खटले दाखल करायला परवानगी नाकारली, तर न्यायालयाने पुढाकार घेणे समजू शकतो. पण

आपली प्रतिष्ठा वाढवण्यासाठी न्यायालयाने राजकीय नेत्यांवर चिखल उडवावा का? मी स्वतः कायद्याचा अभ्यास केलेला आहे. त्यातील बारकावे मला चांगले समजतात.'' पंतप्रधान भावनातिरेकाने आपला मुद्दा मांडत होते. खरे तर ते मुद्दा मांडत नव्हतेच, आपली वेदना आणि दु:ख व्यक्त करीत होते.

पी.व्ही. नरसिंह रावांचे असे मत होते की, पुरेसा पुरावा नसताना केंद्रीय मंत्री आणि सत्ताधारी पक्षातील व इतर वरिष्ठ नेते यांच्यावर खटले दाखल करायला परवानगी देण्यामुळे जनतेत संपूर्ण राजकीय व्यवस्थेविषयीच तिटकारा निर्माण होऊ करू शकतो. शिवाय त्यांनी केसेस दाखल करायला परवानगी दिली, तर राजकीय नेत्यांचा छळ केल्याचा कलंक त्यांच्यावर बसणार होता आणि त्यांना त्या कलंकासह जगणे भाग पडणार होते. आणि त्यांच्या अर्धशतकी राजकीय कारकिर्दीत त्यांनी कधीच कोणाला जाणीवपूर्वक त्रास दिला नव्हता. त्यामुळे आता (कारकिर्दीच्या आणि वयाच्या या टप्प्यावर) ते असे का वागतील?

पंतप्रधानांनी एक पॉज घेतला आणि विजय रामा राव यांना विचारले, ''लालकृष्ण अडवाणी, माधवराव शिंदे, कमलनाथ, अरविंद नेताम यांच्यासारख्या नेत्यांवर सरकारी परवानगीशिवाय खटले दाखल करता येतील का?'' त्यावर रामा राव यांनी नकारार्थी उत्तर दिले. ते ऐकून पंतप्रधान म्हणाले, ''ओके. मी तुम्हाला परवानगी देत नाहीये. लक्षात आले?'' त्यावर शिवरामन आणि विजय रामा राव थोडेसे द्विधा मन:स्थितीत असल्याप्रमाणे पंतप्रधानांना म्हणाले, ''न्यायाधीशांचा एकूण कल लक्षात घेता असे वाटते की– जर आपण खटले दाखल केले नाहीत, तर न्यायालय हस्तक्षेप करेल.''

''तुम्ही न्यायाधीश वर्मांना भेटा व त्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करा.'' असे बोलून पंतप्रधान उठले. पंतप्रधान आपल्या निर्णयावर ठाम आहेत, हे लक्षात येताच ते दोघेही उठले. ते खोलीच्या बाहेर गेल्यावर वैतागलेले पी.व्ही. मला म्हणाले, ''या सर्व गोष्टी मला सांगायला येण्याऐवजी ते न्यायाधीशांचे मतपरिवर्तन का नाही करत?''

या हवाला प्रकरणाची पार्श्वभूमी काय होती. अश्फाक खान नावाच्या अतिरेक्याला काश्मिरातील हिरजा नावाच्या ठिकाणी मार्च १९९१ मध्ये अटक केल्यानंतर काही



उद्योगपतींचे हवालाव्यवहार उजेडात आले होते. त्यापैकी काही जणांना पोलिसांनी अटक केली होती आणि त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार मध्य प्रदेशातील उद्योगपती सुरेंद्र जैन यांच्या घरावर छापा टाकला होता. तिथे पोलिसांना दोन डायऱ्या मिळाल्या होत्या.

त्या डायऱ्यांनुसार असे दिसत होते की, सुरेंद्र जैन याने काही राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकारी यांना ६५ कोटी रुपयांची लाच दिली होती; परंतु डायरीतील नोंदी या केवळ नावांची आद्याक्षरे आणि रकमांचे काही आकडे अशाच स्वरूपात होत्या. अशा परिस्थितीत सीबीआय या प्रकरणात उतरली. सीबीआयला असे लक्षात आले की– काही आद्याक्षरे (LK, KN, MS, AN) काही राजकीय नेत्यांच्या नावांची आहेत, तर इतर काहींचा उलगडा होत नाही. तसेच आद्याक्षरांसमोर जे काही आकडे डायरीत होते, त्यानुसार सीबीआय केवळ रकमांचा अंदाज बांधू शकत होती. जर त्या आकड्यांनुसार रकमा देण्यात आल्या असतील, तर हे स्पष्ट नव्हते की, त्या रकमा हजार/लाख/कोटी अशा कोणत्या स्वरूपात आहेत. मूळ पुराव्याला बळकटी आणणारा इतर कोणताही पुरावा समोर नव्हता.

डायऱ्या उजेडात आल्यानंतर दोन वर्षांनी ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ राम जेठमलानी यांनी मार्च १९९३ मध्ये पंतप्रधानांना पत्र लिहून असे विचारले की, 'सरकारने यावर अजूनपर्यंत कोणतीही कारवाई का केलेली नाही?' त्यानंतर प्रशांत भूषण व कामिनी हे वकील आणि विनीत नारायण व राजेंदर पुरी या पत्रकारांनी सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात जनहित याचिका दाखल केली. आपल्या याचिकेत त्यांनी न्यायालयाला अशी विनंती केली की– ''सरकारने हवाला प्रकरणात आरोप झालेल्या नेत्यांवर आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करणे तर लांबच राहिले, उलट सरकार त्यांचा बचाव करीत आहे, त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी हस्तक्षेप करावा.'' या डायऱ्यांचे महत्त्व १९९४ मध्ये अचानकपणे वाढले. आणि डायरीत नोंदवल्या गेलेल्या नावांच्या आद्याक्षरांवरून खूपच तर्कवितर्क लढवले गेले. यामध्ये लालकृष्ण अडवाणी, माधवराव शिंदे, बलराम जाखड, विद्याचरण शुक्ला, अर्जुन सिंह, शरद यादव, यशवंत सिन्हा, देवीलाल, कमलनाथ, अरविंद नेताम आणि आरिफ मोहम्मद खान या नेत्यांची नावे घेतली गेली.

या प्रकरणी आरोप झालेल्या नेत्यांच्या नावांना मीडियाने भरपूर प्रसिद्धी दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सीबीआयसुद्धा कार्यरत झाली आणि त्यांनी ललित सुरी व आरिफ मोहम्मद खान यांच्या घरावर छापे टाकले. सीबीआयच्या म्हणण्यानुसार या छाप्यांमधून त्यांनी जरी काही कागदपत्रे ताब्यात घेतली, तरी त्या कागदपत्रांनुसारसुद्धा सुरेंद्र जैन आणि अडकलेले नेते व अधिकारी यांच्यात पैशांची देवाण–घेवाण झाली असे सिद्ध करणारा पुरावा मिळालेला नाही. परिणामी, सीबीआयने पुढे चौकशी केली नाही. मात्र सर्वोच्च न्यायालयात 'हवाला'प्रकरणी जनहित याचिका दाखल केलेल्यांनी न्यायाधीश वर्मांना अशी विनंती केली की– 'सरकार दोषींना जाणीवपूर्वक वाचवत आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयला आदेश देऊन आरोपपत्र दाखल करावे.' याचिका कर्त्यांचे हे म्हणणे न्यायाधीश वर्मांनी मान्य केले.

तोपर्यंत सीबीआय आणि एन्फोर्समेंट विभागाच्या लोकांनी या प्रकरणाचा सखोल तपास केला होता, केस दाखल केली होती आणि जैन बंधू व इतर काही जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते; परंतु तेवढ्याने न्यायाधीश वर्मांचे समाधान झाले नव्हते. त्यांनी सीबीआय आणि एन्फोर्समेंट विभागाच्या लोकांना न्यायालयात बोलावून त्यांची उलटतपासणी केली होती. त्यांनी न्यायालयाला सांगितले होते की, याचिकाकर्त्यांनी नावे घेतली आहेत ते राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकारी यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करावे इतका सबळ पुरावा त्यांच्याकडे नाही. ते ऐकून न्यायालयाने त्यांची कठोर शब्दांत निर्भर्त्सना केली आणि त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना न्यायालयात हजर राहण्यास फर्मावले.

त्या काळात न्यायाधीशांची नियुक्ती आणि बदल्या यासंबंधीचे अधिकार स्वत:कडे असावेत, अशी न्यायसंस्थेची मुख्य मागणी असायची. त्यामुळे अशाच एका दिवशी सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश वेंकटचलय्या यांनी (आमची पूर्वओळख असल्याने) मला बोलावले होते आणि पंतप्रधानांकडे देण्यासाठी काही प्रस्ताव दिले होते. आणि कायदामंत्री एच.आर. भारद्वाज यांची त्या प्रस्तावांविषयी पूर्ण सहमती नसतानासुद्धा पंतप्रधानांनी ते प्रस्ताव मान्य केले होते. कारण न्यायसंस्थेविषयी पीव्हींना खूपच आदर होता. राजकारण व प्रशासन यांची खालावत जाणारी पातळी पाहू जाता, पीव्हींचे असे ठाम मत होते की, न्यायसंस्था राजकारणाच्या वर ठेवली पाहिजे.

सरन्यायाधीश वेंकटचलय्या यांच्याकडून आलेले आणि पंतप्रधानांनी मान्य केलेले ते प्रस्ताव उच्च व सर्वोच्च

न्यायायातील वरिष्ठ न्यायाधीशांच्या नियुक्त्या व बदल्या यासंबंधीचे होते. राजकीय हस्तक्षेपापासून न्यायसंस्थेचे संरक्षण व्हावे, यासाठीच हे प्रस्ताव आणण्यात आलेले होते. मात्र न्यायसंस्थेच्या या मागण्या मान्य केल्या असल्या तरी त्यांचा प्रत्यक्षात वापर किती योग्यपणे होईल, याविषयी व्हीपींच्या मनात शंका होत्या. त्यांना असे वाटत होते की, एकूणच समाजातून नैतिकता कमी होत चालली आहे. त्यामुळे न्यायसंस्थासुद्धा घसरणाऱ्या नैतिकतेपासून अपवादात्मक राहू शकत नाहीत.

अशा परिस्थितीत हवाला प्रकरणातील जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश वर्मांच्या समोर आली होती. दरम्यान, या प्रकरणात दोषी ठरू शकणाऱ्या ज्या नेत्यांची नावे माध्यमांतून पुढे आली होती, असे नेते आपली भीती व शंका व्यक्त करण्यासाठी पंतप्रधानांना भेटत होते. अशा नेत्यांना पीव्ही सांगत असत, ''केसचे काय होईल, याविषयी मला माहिती नाही. आपण थांबू या आणि काय होते ते पाहू या.''

एके दिवशी पीव्हींनी मला या केसमध्ये नक्की काय चालले आहे याची माहिती घेण्यास सांगितले. मी विजय रामा राव आणि शिवरामन यांना भेटलो. त्यांनी मला सांगितले की, अगदी कसून तपास करूनसुद्धा केस दाखल करावी असा पुरावा त्यांना सापडलेला नाही. ही माहिती मी पंतप्रधानांच्या सूचनेनुसार माधवराव शिंदे, कमलनाथ आणि अरविंद नेताम यांना दिली.

परंतु इकडे कोर्टात न्यायाधीश वर्मांनी विजय रामा राव आणि शिवरामन या दोघांनाही फैलावर घेऊन विचारले. ''सबळ पुरावा आहे किंवा नाही, हे ठरवणारे तुम्ही कोण? डायरीतील नोंदींनुसार तुम्ही सर्व संशयितांवर केस दाखल करायला हवी होती. तुम्ही ते का करत नाही आहात?'' तेव्हा दोघांनीही न्यायाधीशांना हे स्पष्टपणे सांगितले की, केसेस दाखल करण्यासाठी कोणताही पुरावा नाही आणि डायरीतसुद्धा नेत्यांची नावे नाहीत; तिथे काही नावांची केवळ आद्याक्षरे आहेत. सीबीआय आणि एन्फोर्समेंट विभागाच्या अधिकाऱ्यांनी परिस्थितीजन्य किंवा इतर काही आधारभूत पुरावा मिळतोय का, यासाठी कसून तपास केला आहे; परंतु काहीही पुरावा मिळत नाहीये. त्यामुळे कोणत्याही पुराव्याविना काही थातूरमातूर कारणे दाखवून केस दाखल करण्यात काहीही अर्थ नाही. परंतु त्यांच्या विचार करण्याच्या या पद्धतीला न्यायाधीशांनी तीव्र आक्षेप घेतला. कारण न्यायाधीशांचे असे मत झाले होते की, या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर केस दाखल करू नये यासाठी दबाव टाकला जातोय.

त्यामुळे न्यायाधीश वर्मा या स्तरापर्यंत जाऊन बोलले, ''तुम्ही प्रत्येक केस दाखल करताना पूर्ण पुराव्यानिशी दाखल करता का? तुम्ही पुराव्यांची चिंता करू नका. पुरावा आहे किंवा नाही, हे न्यायालय ठरवेल. ही रूटीन केस नाही; इथे जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे आणि त्या याचिकेमध्ये असा आरोप आहे की, तुम्ही संशयितांना वाचवण्यासाठी कारवाई करायचे टाळत आहात. मी तुमच्याशी सहमत कसा होऊ? तुम्ही केसेस दाखल केल्याच पाहिजेत. जर तुम्हाला सरकारकडून परवानगी हवी असेल, तर तुम्ही ती घ्या आणि केसेस दाखल करा.''

या अशा पार्श्वभूमीवर विजय रामा राव आणि शिवरामन या दोघांचीही इच्छा होती की, कोर्टात जे घडले ते मी पंतप्रधानांना सांगावे. तेव्हा मी त्यांना साळसूदपणे विचारले, ''वरिष्ठ नेत्यांवर कारवाई करण्यासाठी तुम्हाला सरकारच्या परवानगीची गरज नाही का?'' त्यावर ते उत्तरले, ''हो, आम्हाला परवानगीची गरज आहे. मात्र केस

*न्यायमूर्ती जे.एस.वर्मा*



दाखल करण्यासाठी कोणताही पुरावा नसताना सरकारची परवानगी घेण्याचा प्रश्न येतोच कुठे?'' त्यानंतर मी कोर्टात काय घडले हे पंतप्रधानांना सांगितले, तेव्हा ते संतप्त झाले आणि म्हणाले, ''इतक्या साऱ्या वरिष्ठ राजकीय नेत्यांना केवळ कोणाच्या तरी डायरीत आद्याक्षरांच्या काही नोंदी सापडल्या म्हणून कोर्टात खेचावे काय? अशा नेत्यांमध्ये लालकृष्ण अडवाणी आणि माधवराव शिंदे यांच्यासारखे इतर अनेक नेते आहेत, ज्यांना कधीही अशा पैशांची गरज नव्हती आणि अशा (हवालासारख्या) गोष्टी ते कधीही करणार नाहीत. त्या अधिकाऱ्यांना सांगा की, नेत्यांवर केस दाखल करण्यासाठी सरकारची परवानगी मिळणार नाही.''

दुसऱ्या दिवशी ते दोघेही अधिकारी न्यायाधीश वर्मांना त्यांच्या खोलीत भेटले. त्यांनी वर्मांना नोंदी दाखवल्या आणि त्यांना केसेस का दाखल करता येणार नाहीत, ते स्पष्ट करून सांगितले. जरी अडवाणी यांच्यासारखे काही नेते जैन बंधूंना भेटले होते तरी त्यांच्यात पैशांची देवाण-घेवाण झाल्याचा कोणताही पुरावा नव्हता. त्यामुळे या केसमध्ये कोर्टासमोर ठेवण्यासाठी तर सोडाच, अधिकाऱ्यांनासुद्धा सबळ पुरावा वाटत नव्हता. त्यामुळे त्यांनी केस दाखल केल्या नव्हत्या.

त्याच दिवशी संध्याकाळी त्यांच्या या बोलण्यावर न्यायाधीश वर्मांनी कशी तीव्र प्रतिक्रिया दिली, हे या दोघा अधिकाऱ्यांनी मला सांगितले. त्यांच्या बोलण्यानुसार, न्यायाधीश वर्मांनी त्यांना विचारले, ''तुम्ही केवळ सबळ पुरावा असतानाच केस दाखल करता? कायद्यासमोर सर्व जण समान नाहीत का? ज्येष्ठ राजकीय नेते संशयित आहेत म्हणून तुम्ही असा निष्कर्ष काढलात का की, केसेस दाखल करायची गरज नाही? न्यायालयासमोर जनहित याचिका असताना तुम्ही असा निर्णय घेण्याची हिंमत तरी कशी केलीत? राजकीय पेचप्रसंग निर्माण होईल याचा विचार करून न्यायालयाने आपले काम करूच नये की काय? जेव्हा एखादे प्रकरण न्यायप्रविष्ट असते, तेव्हा त्यात ढवळाढवळ करण्याचा तुम्हाला काहीही अधिकार नाही. पुरावा सबळ आहे किंवा नाही, हे ठरवण्याचे काम न्यायालयाला करू द्या.'' न्यायाधीश वर्मांची ही प्रतिक्रिया मी पंतप्रधानांना कळवावी, असे या दोघा अधिकाऱ्यांना वाटत होते.

०

जसे या प्रकरणाचे गांभीर्य वाढत गेले तशी मी या दोघा अधिकाऱ्यांची आणि पंतप्रधानांची भेट घडवून आणली. जेव्हा आम्ही तिघे एकत्र पंतप्रधानांसमोर बसलो, तेव्हा आतापर्यंत काय घडले आहे ते सर्व ऐकून पीव्हींचा अवतार 'उग्र नरसिंहा'सारखा झाला होता. पीव्हींनी जेव्हा त्यांना अगदी स्पष्टपणे सांगितले की, सरकार परवानगी देणार नाही; तेव्हा शिवरामन आणि विजय रामा राव आपल्या माना डोलवत आणि 'हो सर' असे पुटपुटत बाहेर पडले. दोन दिवसांनी ते न्यायालयातून परत आले आणि पुन्हा पंतप्रधानांना भेटले. त्यांनी पंतप्रधानांना सांगितले, ''सर, न्यायाधीश वर्मांनी असा इशारा दिला आहे की, जर सीबीआयने चौकशी सुरू नाही केली तर न्यायालय ही केस सीबीआय व एन्फोर्समेंट विभाग या दोघांकडूनही काढून घेईल, एका चौकशी आयोगाची नियुक्ती करेल आणि तपास थेट आपल्या हाती घेईल.'' उद्या पुन्हा भेटू या, असे म्हणून पीव्हींनी त्यांना परत पाठवले.

त्यांचे बोलणे ऐकून पी.व्ही. नरसिंह राव आमच्या नजरेला जाणवण्याइतके क्षुब्ध आणि अस्वस्थ झाले होते. त्यांना असे वाटत होते की, सरकार चौकशीत आणि तपासात जाणीवपूर्वक अडथळे आणत आहे, अशी न्यायालयाची खात्री झाली आहे. हे न्यायालयीन सक्रियतेचे प्रकरण होते. पंतप्रधानांना असेही वाटत होते की, सीबीआयचे प्रमुख आणि स्वतः पंतप्रधान आंध्र प्रदेशचे आहेत यावरून कोर्टाने काही प्रतिकूल निष्कर्ष काढले असावेत.

त्याआधीचा एक प्रसंग असा होता. जेव्हा सीबीआय प्रमुखाचे पद रिक्त झाले होते, तेव्हा येणाऱ्या नव्या प्रमुखांच्या नेमणुकीबाबत केंद्रीय गृह मंत्रालयाने पर्सोनेल विभाग आणि मंत्रिमंडळाची नियुक्तीविषयक समिती यांच्याद्वारे कार्यवाही केली होती. त्यांनी शॉर्ट लिस्ट केलेल्या अधिकाऱ्यांची नावे कॅबिनेट सचिव आणि गृहमंत्री यांच्याद्वारा पंतप्रधानांच्या संमतीसाठी पाठवली होती. शॉर्ट लिस्ट केलेल्या तीन अधिकाऱ्यांमध्ये रामा राव केवळ सर्वांत ज्येष्ठ होते असे नव्हे, तर त्यांचे नाव यादीत (गुणवत्तेनुसार) पहिल्या क्रमांकावर होते. विजय पीव्ही जरी आंध्र प्रदेशचे असले तरी त्यांना विजय रामा राव यांच्याविषयी काहीही माहिती नव्हती. त्यांनी आपले ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी एव्हीआर कृष्णमूर्ती यांच्यामार्फत रामा रावांची सर्वसाधारण चौकशी केली. जरी कृष्णमूर्ती रामा रावांना ओळखत होते तरी त्यांचा गेल्या काही वर्षांत रामा रावांशी संपर्क नव्हता. त्यामुळे पंतप्रधानांनी मला माझे मत विचारले. माझी रामा रावांशी अतिशय चांगली ओळख होती. तेलुगू देसमचे एन.टी.रामा

राव मुख्यमंत्री असताना मी माहिती विभागाचा आयुक्त होतो आणि विजय रामा राव गुप्तहेर खात्याचे प्रमुख होते. त्यामुळे आमची जवळपास रोज भेट होत असे. ते अतिशय मेहनती, प्रामाणिक, कार्यकुशल आणि प्रोफेशनल अधिकारी होते.

माझे हे मत मी पीव्हींना कळवले. रामा रावांच्या नियुक्तीविषयी पीव्हींच्या स्वतःच्या काही शंका होत्या. त्यांना असे वाटत होते की– 'दिल्लीतील लोकांना असे वाटेल की, राजकीय हितसंबंध जपण्यासाठी पंतप्रधानांनी त्यांना जाणीवपूर्वक नियुक्त केले. जर आपल्याला खटल्यांवर काही प्रभाव टाकायचा असेल, तर सीबीआयमध्ये आपला माणूस असणे गरजेचे असते. परंतु असा प्रभाव टाकण्याचे माझ्या मनात येत नाही. त्यामुळे जर ते सीबीआयचे प्रमुख झाले, तर ते आपल्या गळ्यातले लोढणे होऊन बसतील.' त्यावर मी त्यांना सांगितले, ''सर, ते यादीत प्रथम क्रमांकावर आहेत, त्यांची नियुक्ती करण्यासाठी आपण काही विशेष प्रयत्न करीत नाही आहोत. उलट जर रामा राव केवळ आंध्र प्रदेशचे आहेत म्हणून आपण त्यांना पद नाकारले, तर त्यांच्यावर तो मोठाच अन्याय होईल.'' यावर 'मी अजूनही कम्फर्टेबल नाहीये' असे म्हणत पीव्हींनी त्यांची सीबीआय प्रमुखपदी नियुक्ती केली.

तर या मागच्या घटनेचा संदर्भ देत पी.व्ही. मला म्हणाले, ''माझी इच्छा नसतानासुद्धा तुम्ही आणि कृष्णमूर्ती अशा दोघांनी त्या वेळेस रामा राव यांना सीबीआय प्रमुखपदी नेमावे, असे म्हटले होते. ते नक्कीच एक कार्यक्षम अधिकारी आहेत. पण आता पाहा, न्यायालयाने कशी आपल्या सचोटीबाबत शंका घेतली आहे. निवडणुका जवळ आल्या आहेत. माधवराव शिंदे, लालकृष्ण अडवाणी यांच्यासारख्या नेत्यांची प्रतिष्ठा जपण्यासाठी मी न्यायालयाशी संघर्ष करू, की न्यायालयाचा हस्तक्षेप टाळण्यासाठी सीबीआयला या नेत्यांच्या चौकशीची परवानगी देऊ?... जर मी केसेस दाखल करण्याची परवानगी दिली नाही तर लोक म्हणणार, बघा, काँग्रेस कशी भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण देते आणि याचा निवडणुकीत प्रतिकूल परिणाम होणार. दुसऱ्या बाजूला जर मी केसेस दाखल करण्याची परवानगी दिली, तर अतिशय निष्कलंक असे काही मित्र व सहकारी यांच्यावर अन्याय होईल आणि त्यांचा रोष मला ओढवून घ्यावा लागेल...''

एका बाजूस आपली सदसद्विवेकबुद्धी आणि दुसऱ्या बाजूस पक्षाचे हित– यापैकी कशाला प्राधान्य द्यायचे, या विचारामध्ये पीव्ही गढले होते. ते काही काळ शांत राहिले. जसे मी त्यांच्या द्विधा मनःस्थितीविषयी कल्पना करू लागलो, तसे मला काटेरी मुकुट म्हणजे काय असते याचा अर्थ लक्षात येऊ लागला. पीव्ही उठले आणि आत जाता–जाता मला म्हणाले, ''मी पक्षाचे हित व्यक्तींपेक्षा जास्त महत्त्वाचे मानतो. आता मला न्यायसंस्थेशी संघर्ष, तोसुद्धा राजकीय भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून नको आहे. या प्रकरणी कोणताही सबळ पुरावा नसल्याने अतिउत्साही न्यायालयालासुद्धा ही केस सोडून द्यावी लागेल... विजय रामा रावांना सांगा, माझ्याकडे फाईल पाठवू द्या. मी केस दाखल करण्याची परवानगी देतो...''

वीर संघवी यांनी लिहिलेल्या माधवराव शिंदे यांच्या चरित्रात हा प्रसंग मोठ्या सविस्तरपणे वर्णन केला आहे. मात्र त्या पुस्तकात जे काही लिहिले आहे, त्यापासून सत्य बरेच वेगळे आहे. त्या पुस्तकातील वर्णन स्वतः लेखकाचे किंवा माधवराव शिंदे यांचे मत असावे. पण एवढेच कशाला... ज्यांच्यावर खटले दाखल केले गेले, त्या सर्वांना असे वाटत राहिले की– पीव्हींनी राजकीय कारणांसाठी खटले दाखल करायला परवानगी दिली; प्रत्यक्षात ते खरे नव्हते. उलट, या निर्णयामुळे सर्वाधिक त्रास पीव्हींना झाला. १९९६ च्या निवडणुका तोंडावर आलेल्या असताना त्यांना पक्षातील अनेक निष्ठावान अनुयायी सोडून गेले. या निर्णयामुळे ते स्वतःही खूष नव्हते, उलट नाखूषच होते. पण या अशा कारणाने त्यांना न्यायसंस्थेशी संघर्ष टाळायचा होता... त्यामुळे परवानगी दिल्यावरसुद्धा ते अस्वस्थ होते आणि त्यांना असे वाटत होते की, खटले दाखल करायला परवानगी द्यायला नको होती. म्हणजे हा एक असा निर्णय होता, ज्याविषयी त्यांना तो निर्णय घेताना आणि नंतरसुद्धा बराच त्रास झाला.

१९९६ च्या निवडणुका झाल्यानंतर काही महिन्यांनी सर्वोच्च न्यायालयाने आपली 'हवाला' प्रकरणाची कार्यवाही पूर्ण केली आणि सबळ पुराव्याअभावी केस विसर्जित केली. त्या निकालानंतर जेव्हा मी पीव्हींना भेटलो, तेव्हा त्यांचे डोळे पाणावले होते...

मराठी अनुवाद : **संकल्प गुर्जर**
sankalp.gurjar@gmail.com
Mob. : 08826629034

*(Wheels Behind the Veils या पुस्तकातील एक प्रकरण. लेखक पंतप्रधान नरसिंहरावांचे माध्यम सल्लागार होते. हवाला प्रकरणाला२० वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्ताने हा लेख.)*

अभिवादन

नरेंद्र चपळगावकर

पाडगांवकरांनी लेखनाचे जे अनेक प्रयोग केले त्यात मीरा, कबीर आणि सूरदास यांच्या रचनांचा समवृत्त अनुवाद फार महत्त्वाचा आहे. कवितेचा अनुवाद ही फारच अवघड गोष्ट असते. प्रत्येक भाषेतील शब्दाला त्या त्या भाषेत एक विशिष्ट अर्थ असतो आणि तो शब्द कवितेत आला व तिथल्या संदर्भाच्या कोंदणात तो बसला म्हणजे त्याचे अर्थसूचन अधिक वाढते. पाडगांवकरांनी– खरे म्हणजे त्यांच्यातल्या कवीने– हे आव्हान स्वीकारले.

# गात गात गळून गेले पिकले पान

सन १९६२. दहावे मराठवाडा साहित्य संमेलन बीडला माझ्या गावी भरणार होते. व्यवस्थेचा भार माझ्यावर असला, तरी संमेलनातील महत्त्वाचे कार्यक्रम औरंगाबादेतील साहित्य परिषदेच्या ज्येष्ठांनी निश्चित केले होते. वा.ल.कुलकर्णी, भगवंतराव देशमुख, अनंत भालेराव वगैरेंचा त्यात सहभाग असे. 'परंपरा आणि नवता' या विषयावर विंदा करंदीकरांनी निबंध वाचावा आणि त्यावर वा.ल. कुलकर्णी, श्री.पु. भागवत, वसंत बापट, भालचंद्र कहाळेकर, नरहर कुरुंदकर, भगवंतराव देशमुख आदींनी चर्चा करावी, असे ठरले होते. संमेलनाचे स्वरूप तेव्हा आटोपशीर आणि आर्थिक दृष्ट्या कनिष्ठ–मध्यमवर्गीय असे. पाहुणे कोणाच्या तरी घरी उतरत. श्री.पु. भागवत मुंबईहून आपली गाडी घेऊन बीडला आले, सोबत विमलाबाई तर होत्याच; शिवाय आणखी एक अनपेक्षित पाहुणा होता. ते होते मंगेश पाडगांवकर. त्यांना पाहून आम्हाला अतिशय आनंद झाला. पाडगांवकरांना चर्चेत भाग घेण्याचे किंवा कवी संमेलनात भाग घेण्याचे निमंत्रण नव्हते. तरीही त्यांना श्रीपुंनी आग्रहाने आपल्याबरोबर आणले होते. आल्या–आल्याच त्यांनी सांगून टाकले की– 'मी फक्त प्रेक्षक म्हणून आलो आहे; कार्यक्रमांत भाग घेणार नाही.' त्यांची भूमिका रास्त होती. संमेलनाच्या सर्व कार्यक्रमात पाडगांवकर श्रोत्यांच्या पहिल्या रांगेत बसून पूर्णवेळ ऐकत असत.

पाडगांवकर हे वालंचे विल्सन हायस्कूलमधले विद्यार्थी. शुद्धलेखनाच्या चुका वालंना अजिबात खपत नसत. आपल्या या शिष्यालाही त्यांनी त्याबद्दल अनेक वेळा शिक्षा केल्या असणार; पण त्याच्या कवितेवर प्रेमही केले. औरंगाबादला वा.ल. असताना पाडगांवकर अनेक निमित्तांनी तेथे आले. त्यांची आम्हा मित्रांशी ओळखही झाली. औरंगाबादला आले की वालंप्रमाणेच ते अनंत भालेरावांच्या भेटीला जात. कधी तिथेही आमची भेट होई. त्या काळात औरंगाबादेत गुलमंडीजवळच्या एका जुन्या फोटो स्टुडिओत मी आणि सुधीर रसाळांनी पाडगांवकरांबरोबर एक फोटोही काढून घेतला; तो अजून माझ्याजवळ आहे. पाडगांवकरांचे 'धारानृत्य'मधले अडखळते आणि इतरांचे संस्कार असलेले आविष्कार मागे पडून 'जिप्सी'त प्रगट झालेल्या त्यांच्या 'सौंदर्यजीवी आणि भावजीवी' कवित्वाची भलावण वालंनी केली होती. विद्यापीठाच्या कार्यकारिणीने वालंना दिलेली मुदतवाढ त्या वेळच्या कुलगुरूंनी प्रत्यक्षात मिळू दिली नाही तेव्हा जे वादंग झाले, त्या काळात विद्यापीठाच्या विद्यार्थी संसदेचे पाहुणे म्हणून पाडगांवकर तिथे आले होते. त्या समारंभातले

त्यांचे भाषण म्हणजे गुरू-शिष्य संबंधांचा एक भावपूर्ण आलेख होता.

करंदीकर, बापट आणि पाडगांवकर हे आमच्या पिढीचे आवडते कवित्रिकूट. त्यांच्यापेक्षा वयाने थोडे ज्येष्ठ असलेले बोरकरही आमच्या मनात त्याच रांगेत बसलेले. प्रेम करण्याच्या वयात ज्यांच्या कविता आमचे (म्हणजे मी आणि समवयस्क मित्रांचे) मन सतत गुणगुणत असे, त्यात सर्वांत जास्त कविता पाडगांवकरांच्याच होत्या. 'मी इतुकी भित्री.... असे कसे मग घडले, मज नव्हते ठाऊक, अजून नाही कळले!' यासारखी कथाकविता तर आम्हाला संपूर्ण पाठच झाली होती. कदाचित आमची त्या काळातली स्वप्ने पाडगांवकरांच्या कवितांतून डोकावत असावीत. 'अहो जग पुढे गेले' किंवा 'विस्मरणाचे दान तुझे सरले आज, आठवणींचा घेऊनि आलिस सुंदर साज' यांसारख्या लयबद्ध कवितासुद्धा आम्ही सतत गुणगुणत असू.

जीवनातल्या सौंदर्यावरती तसेच 'कविता' या अभिव्यक्ति-माध्यमावरसुद्धा विलक्षण प्रेम असणाऱ्या या कवीची लयीची जाणीव फार खोल होती. ती अभ्यासाने आलेली नव्हती, तर त्यांच्या कवितेचा तो अंगभूत भाग होता. 'गण-मात्रांचे व्याकरण न घोकताही ते ज्ञान मला सहजतया आले' असे त्यांनीच म्हटले आहे. निसर्ग आणि अर्थातच प्रेम या आपल्या प्रेरणा आहेत, असे त्यांनी सांगितले आहे. या प्रेरणांतून जन्माला आलेली त्यांची कविता अनेकांना रोमँटिक वाटते. त्यातली काही खरोखरच रोमँटिक आहे; पण निखळ काव्यमूल्यांना रोमँटिसिझम नेहमीच छेद देतो, असे नाही. रोमँटिक कवितासुद्धा सच्ची असू शकते. त्यातले जीवन कचकड्यासारखे खोटे नसावे, एवढेच.

जडण-घडणीच्या वयात पाडगांवकरांना काका कालेलकरांसारख्या रसिक देशभक्ताचा सहवास लाभला. त्यांचा जन्मच मुळी निसर्गाचे वरदान लाभलेल्या वेंगुर्ल्यात झाला होता. पाडगांवकरांनी काही काळ 'साधना'च्या संपादकीय विभागात कामही केले होते. राष्ट्रसेवादल आणि लोकशाही समाजवादी विचारांचे कार्यकर्ते हा त्यांच्याही आत्मीयतेचा भाग होता. वसंत बापटांनी कलापथकासाठी गाणीही लिहिली. पाडगांवकरांनी चळवळीत असा आपला

*रसाळ, पाडगांवकर, चपळगावकर*



सहभाग नोंदवला नाही; पण त्यांची कविता हुकूमशाहीची उन्मत्त अवस्था सांगण्यासाठी अनेक वेळा प्रगट झाली आहे. आणीबाणी होती तेव्हा पाडगांवकरांनीच केलेला रवींद्रनाथांच्या प्रख्यात इंग्रजी गीताचा अनुवाद अनेकांनी आपल्या शुभेच्छापत्रांवर छापला होता आणि आपली स्वातंत्र्याशी असलेली बांधिलकी प्रगट केली होती.

चित्त जिथे भीतिशून्य, उंच जिथे माथा
ज्ञान जिथे मुक्त तिथे जागृत करि नाथा

सत्तेने उन्मत झालेल्यांची वरात आली की, प्रत्येक सज्जनाच्या उरात जीवघेणी कळ कशी येते, हे सांगणारी कविता त्यांनी आणीबाणीत लिहिली होती. समाजात माजलेला दंभ आणि ढोंग हा तर त्यांच्या अनेक कवितांचा आणि एक-दोन कवितासंग्रहांचा विषयच झाला आहे. त्यांच्या अनेक कविता सत्ताधारी असलेल्यांचे बुरखे फाडणाऱ्या आणि ज्यांची संख्या सतत वाढती असते अशा लाचारांच्या लाळघोटेपणाचा निर्देश करणाऱ्या आहेत. पण या कवितांचे राजकीय असे वर्गीकरण केले तरी त्या प्रचारकी अजिबात नाहीत. समाजातल्या दंभाविषयीची चीड हीसुद्धा काव्यरूप घेऊ शकते, हेच पाडगांवकरांनी दाखवले आहे. समाजजीवनातील एखाद्या व्यक्तीचे उत्तुंग चारित्र्य हे जसे कवितेचा विषय होऊ शकते, तसेच राजकारणातील मुजोरी आणि लाचारी ही कवितेतून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचा विषय होऊ शकते. या कविता लिहिताना त्यांच्यासमोर एखादी व्यक्ती किंवा पक्ष नसतो; असते ती सर्वसाधारण प्रवृत्ती. म्हणूनच ती काव्यरूप घेऊ शकते. दारिद्र्यात जगणाऱ्या सामान्य माणसाची राजकारणात आणि राजकारण्यांकडून होणारी परवड सांगणारे एक 'प्रश्नोपनिषद्' पाडगांवकरांनी लिहिले आहे.

या फूटपाथच्या पोरांचे राष्ट्र कुठले?
यांच्यावर पाखर धरील असे निशाण कुठले?
यांचे पुराण कुठले? कुराण कुठले? धम्मपद कुठले?
यांच्यासाठी उषःकाल होईल असे क्षितिज कुठले?
......
कुणी हाक दिली आणि हे पेटून उठले,
कुणी घोषणा केल्या आणि हे लढत सुटले,
यांची बेवारशी प्रेते लागली काळोखाच्या काठाशी :
म्हणतात जे आले यांच्यासाठी, ते स्वातंत्र्य कुठले?

असाच भेदक प्रश्न वसंत बापटांनीही विचारला आहे (कुणा स्वातंत्र्य, कुठे स्वातंत्र्य). जीवनातल्या सौंदर्याचा, निसर्गातल्या सौंदर्याचा आनंद घेताना, जीवनावर प्रेम करताना समाजातल्या भेदक वास्तवाचे भान पाडगांवकरांनाही होते. त्यांचे कविमन फुटपाथवरच्या या पोरांसाठीही स्रवत होते.


पाडगांवकरांनी अनेक गीते लिहिली आहेत. रसिक मराठी घरात पाडगांवकरांची ही भावगीते पंधरा-वीस वर्षे तरी प्रचंड लोकप्रिय होती. या सगळ्याच गीतांना कविता म्हणावे, असा माझा आग्रह नाही आणि ते मला अभिप्रेतही नाही; परंतु एखाद्या गीताच्या ओळी कवितेच्या जवळ जातात, तेव्हा त्यांचे वेगळेपण का लक्षात घेऊ नये?

'एक एक नक्षत्राचा दिवा लागताना
आणि फुले होण्यासाठी कळ्या जागताना'

अशा ओळी चाल लावता येणाऱ्या गीताच्या आहेत म्हणून त्यांच्यातले कवितापण कशाकरता नाकारावयाचे?

पाडगांवकरांनी लेखनाचे जे अनेक प्रयोग केले त्यात मीरा, कबीर आणि सूरदास यांच्या रचनांचा समवृत्त अनुवाद फार महत्त्वाचा आहे. कवितेचा अनुवाद ही फारच अवघड गोष्ट असते. प्रत्येक भाषेतील शब्दाला त्या त्या भाषेत एक विशिष्ट अर्थ असतो आणि तो शब्द कवितेत आला व तिथल्या संदर्भाच्या कोंदणात तो बसला म्हणजे त्याचे अर्थसूचन अधिक वाढते. पाडगांवकरांनी- खरे म्हणजे त्यांच्यातल्या कवीने- हे आव्हान स्वीकारले. अनुवाद करण्याअगोदर या तिघांचे जीवन आणि त्यांचे तत्त्वज्ञान त्यांनी समजून घेतले. रचनेचे मूळ जर एखाद्या संस्कृत ग्रंथात असेल, तर तेही वाचण्याचा प्रयत्न केला आणि त्या प्रकाशात अनुवाद केले. आज पाडगांवकरांच्या प्रतिभेने केलेल्या या कष्टप्रद कामामुळे या तीन संतांच्या रचनांचा आस्वाद घेणे मराठी रसिकांना अधिक सुखकर झाले आहे. असेच त्यांनी केलेले दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे, शेक्सपिअरच्या निवडक नाटकांची भाषांतरे. दुर्दैवाने याही कामाची दखल जेवढी घेण्यात यावयास हवी होती, तेवढी मराठी समीक्षकांकडून घेतली गेलेली नाही.

बोरकर, करंदीकर, बापट आणि पाडगांवकर या चार आवडत्या कवींचा स्नेह होण्याचा योग आला असला, तरी माश्याअधिक वेळा भेटी होत त्या पाडगांवकरांशी. कधी त्यांचा एखाद्या कार्यक्रमात परिचय करून देताना, कधी कवीसंमेलनाचा समारोप करताना, कधी त्यांची मुलाखत घेताना, कधी कुटुंबीयांनी केलेल्या त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने या भेटी होत. त्यांनी आपली बहुतेक पुस्तके मला आणि माझ्या पत्नीला भेट दिली आहेत. त्यावरचे त्यांचे वळणदार अक्षर आणि लपेटदार सही या त्यांच्या



व्यक्तित्वखुणा आमचा मोलाचा ठेवा आहेत. माझ्या प्रत्येक वाढदिवशी त्यांचा न चुकता शुभेच्छांचा फोन येई. पाडगांवकर त्याबद्दल दक्ष असत. त्यांच्या लेखनप्रयोगात आणखी एक महत्त्वाचा प्रयोग आहे. तो म्हणजे, बोलगाण्यांचा. 'बोलगाणी' आणि त्याच्याही अगोदर 'कविता माणसांच्या, माणसासाठी' या दोन संग्रहांत पाडगांवकरांनी नेहमीच्या बोलभाषेत लिहिलेल्या कविता आहेत. 'बोलभाषा' ही संज्ञा मी वापरली ती त्यातले शब्द सोपे आहेत म्हणून नव्हे. दोन व्यक्तींच्या संभाषणात जी अकृत्रिमता असते, जो सहजपणा असतो; जो जिव्हाळा असतो तो प्रतिमांच्या साह्याने बोलणाऱ्या कवितेत येतोच, असे नाही. पण सामान्य माणसे कविमनाची असली तरी ती कवितेत बोलत नाहीत. आपल्या भावना ते ज्या भाषेत व्यक्त करतात, ती भाषा पकडण्याचा पाडगांवकरांचा या लेखनात प्रयत्न आहे. या कवितांत अनुभवांचे स्वरूप फारसे संपृक्त किंवा गुंतागुंतीचे नसते. तो अनुभव सामान्य माणसाला समजेल असा साधा असतो. तरीही तो काव्यरूप घेतो. पाडगांवकर आपल्या सगळ्याच कविता वेगवेगळ्या प्रसंगी वाचत असत; पण 'बोलगाणी'मधल्या गाण्यांनी त्यांचा आणि श्रोत्यांचा जो संवाद होई, तो फारच जवळिकीचा असे. पाडगांवकर हे आपले घनिष्ठ मित्र आहेत, आपले कुटुंबीय आहेत– असेच प्रत्येक श्रोत्याला वाटत असे. पाडगांवकरांच्या वाचनात आणि मुद्राभिनयातसुद्धा एक नाट्य असे. त्यांना काव्यवाचनाचा एवढा मोह पडत असे की, ते कित्येक वेळा प्रकृतीकडे दुर्लक्ष करून दूरदूरची आणि अवघड वाटांची निमंत्रणेही स्वीकारीत. त्यामागे या संवादातल्या जवळिकीचा पुन्हा एकदा अनुभव घेण्याचीच इच्छा असे.

गेले काही दिवस त्यांच्या प्रकृतीने साथ सोडून दिली होती. हृदयावरील शस्त्रक्रियेच्या वेळी मला पाच ब्लॉक्स होते; आता मी ठणठणीत आहे– असे सांगणाऱ्या पाडगांवकरांना शेवटी वयाला शरण जावे लागले. श्रोत्यांशी संवाद अशक्य झाला आणि त्यांनी जगाचा निरोप घेतला. पाडगांवकरांच्या जाण्याचे दुःख माझ्यासारखा त्यांचा चाहता काय करणार? पाडगांवकरांना जाताना दुःख झालं नसणार! तेच म्हणाले ना–

गिरक्या गिरक्या घेत घेत
नाचत जातं पिकलं पान,
कविता पिवळी पिवळी धमक
वाचत जातं पिकलं पान!

– असेच त्यांचे जाणे झाले असणार!

**नरेंद्र चपळगावकर,** औरंगाबाद
Mob.: 9422712121

आनंद करंदीकर

बहिणाबाईंचे लग्न तेराव्या वर्षी झाले; तीन लहान मुले पदरात असताना त्यांचा नवरा वारला. बहिणाबाईंनी बालविवाहाचे आणि अकाली विधवा होण्याचे दु:ख स्वत: अनुभवले. अशा इतरही स्त्रिया त्यांच्या आजूबाजूला खूप असणार. बहिणाबाई संवेदनशील होत्या, अभिव्यक्तिप्रवण होत्या आणि तरीही बहिणाबाईंच्या कवितेत स्त्रियांच्या परिस्थितीचे, स्त्रियांच्या दु:खाचे चित्रण का नाही?– हा प्रश्न मला भेडसावतो आहे. या प्रश्नाला सहज-सोपे उत्तर सापडत नाही. मी काही तर्क करू शकतो.

# बहिणाबाईंची गाणी

उत्पादक श्रमात, त्यांतून मिळणाऱ्या आनंदात 'माणूसपण' आहे याचा समग्र जीवनस्पर्शी अनुभव बहिणाबाईंच्या कवितांत आहे. शेतीतील कामे नेमकेपणे आणि तरीही रसाळ भावस्पर्शीपणे त्यांच्या कवितांतून रेखाटली आहेत. कवितांची नावेच आहेत– 'पेरनी', 'कापनी', 'रगडनी', 'उपननी'. या कामांचे वर्णन करताना त्यांना फार सुरेख आणि आगळ्याच उपमा सुचतात :

उठा उठा बहिनाई  
बोंडं कपाशीचे वेचा  
बोट हालवा हालवा  
जशा पाखराच्या चोचा

शेतीतील अवजारांवरही त्यांची कविता आहे, तिचा शेवट त्या 'नागर नागर सर्व्या सुखाचे आगर', असा करतात.

बहिणाबाईंचा उत्पादक कामातील आणि यंत्रातील 'रस' शेतीपुरता मर्यादित नाही. गावातल्या लहान छापखान्याच्या कामातही त्यांना रस आहे. त्यांना ते मनोरंजनाचे साधनही वाटते. त्या लिहितात–

किती शिसाच्या चिमट्या  
ठसे काढले त्यावर  
कसे निघती कागद  
छापिसनी भराभर  
चाले 'छाप्याचं यंतर'  
जीव आठें बी रमतो  
टाकीसनी रे मंतर  
जसा भगत घुमतो

घरकामाचे वर्णनही त्या सामान्यत: प्रेमाने करतात. दळण दळताना हाताला थकवा येतो, भाकरी भाजताना हाताला चटके बसतात, विहिरीची मोट उतरते आणि चढते– यातही त्या जीवनातील महत्त्वाची सत्ये शोधतात. 'चुल्हा पेटता पेटेना'मध्ये सुरुवातीला काड्यापेटीमधील काड्या संपल्या तरीसुद्धा विस्तव पेटत नाही म्हणून आलेला वैताग आहे, मग भाकरी छान भाजल्याचा आनंद आहे आणि शेवटी तापलेल्या तव्यावर पाणी शिंपडल्यावर आलेल्या आवाजात तवा 'खसा खदाखदा हासे' असा श्रमपरिहारी काव्यानुभावही आहे. बहिणाबाईंना, 'उठ जान शेती कामाचा किती घोर। तू गोठ्यामधलं ढोर' असे क्वचितच वाटते, पण तो अगदी अपवाद आहे.

उत्पादक श्रमांच्या जोडीलाच बहिणाबाईंच्या कवितांत नातेवाइकांचे, गावातील लहान-थोर व्यक्तींचे, गावगाड्याचे चांगले सामाजिक भान आहे. कोठल्या बलुतेदार जाती कोठले काम करतात याचे चांगले विनोदी व्यंग्यचित्रात्मक वर्णन 'अनागोंदी कारभार' या कवितेत

आहे.

महारवाड्याचे वर्णन बहिणाबाई मनाला वेदना होतील असे सांगतात :

देखा महारवाड्यात
नावाचेच घरदार
भटकती गावामधी
चाले तोंडाने जोहार
देखा महारवाड्यात
कशी माणसाची दैना
पोटामधी उठे आग
चुल्हा पेटता पेटेना!
महारकी महारकी
गावकरी ठेकेदार
गावातल्या पाटलाचे
हुकूमाचे ताबेदार!

सावकाराची श्रीमंती आणि शेतकऱ्याची गरिबी त्यांना जाणवते. त्या दोघांमधील नातेही त्यांना कळते. त्याचे वर्णन त्या देवांची आणि त्यांच्या मंदिरांची तुलना करून करतात; सावकाराची त्या टिंगलही करतात–

सोन्यारुपानं मढला
मारवाड्याचा बालाजी
शेतकऱ्याचा इठोबा
पानाफुलामधी राजी
सावकारा, तुझं मन
मोहोरी एवढं
तुझा राकेसाच डाच
तुझं पोट रे केव्हढं?

**स्त्रीचे आनंद, स्त्रीचे दु:ख, स्त्रियांची परिस्थिती**

उत्पादक श्रम, अनेक लोक, नातेवाईक, सर्व गाव, निसर्ग यांचे इतके समर्थ चित्रण करणाऱ्या बहिणाबाईच्या कवितेत स्त्रियांच्या आनंदाचे, स्त्रियांच्या दु:खाचे, स्त्रियांच्या परिस्थितीचे चित्रण अजिबात नाही. जणू हे सार्वत्रिक विधान सत्य वाटावे म्हणून, अपवाद म्हणून, सासूबद्दल दोन ओळी अशा आहेत :

उठ सासुरावाशिन बाई
सुरू झाली वटवट, कातावली वो सासू
पूस डोयान मधिले आसू
उठ सासुरावाशिन बाई
घे सोशिसन घे, घालू नको वो वाद


बहिणाबाई चौधरी

कर माहेराची याद

आणि एके ठिकाणी बाईकडे रस्त्यात वळून पाहणाऱ्या पुरुषाला झापलेले आहे :

रास्त्यानं चालली
मायबहीन आपली
मांघे फिरी पाह्य
पाप्या, धरत्री कापली

इतरत्र सासूच्या विनोदी स्वभावाचे वर्णन आहे, तिचे गुण सांगून 'ती माझी दुसरी आई आहे' असेही म्हटले आहे. माहेरच्या आठवणी आहेत आणि 'लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदिते' अशी हृद्य काव्यपंक्तीही आहे. (योगी आणि सासुरवाशीण, बहिणाबाईची गाणी, साहित्यप्रसार केंद्र, २०१४. पृ.५८). पण माहेरची ओढ हे स्त्रीचे आनंद, स्त्रीचे दु:ख, स्त्रियांची परिस्थिती यांचे विशेष वर्णन नाही.

बहिणाबाईंचे लग्न तेराव्या वर्षी झाले; तीन लहान मुले पदरात असताना त्यांचा नवरा वारला. बहिणाबाईंनी बालविवाहाचे आणि अकाली विधवा होण्याचे दु:ख स्वत: अनुभवले. अशा इतरही स्त्रिया त्यांच्या आजूबाजूला खूप असणार. बहिणाबाई संवेदनशील होत्या, अभिव्यक्तिप्रवण होत्या आणि तरीही बहिणाबाईंच्या कवितेत स्त्रियांच्या परिस्थितीचे, स्त्रियांच्या दु:खाचे चित्रण का नाही?– हा प्रश्न

मला भेडसावतो आहे. या प्रश्नाला सहज-सोपे उत्तर सापडत नाही. मी काही तर्क करू शकतो.

पहिली शक्यता ही की- बहिणाबाईंनी पुरुषप्रधान, पुरुषसत्ताक व्यवस्था इतकी सहज, नैसर्गिक म्हणून स्वीकारली होती की; त्यातून निर्माण होणारी परिस्थिती त्यांना कमालीची स्वाभाविक वाटली. त्याबद्दल काय लिहायचे, काय कविता करायची, हे असेच असायचे- अशी त्यांची धारणा असावी. त्यांनी पुरुषप्रधानता स्वाभाविकपणे स्वीकारली होती, याला दुजोरा मिळेल अशा चार ओळी त्यांच्या काव्यात आहेत. या कवितेत आपले दोन 'लाल' सुखी राहोत, असे देवाला मागणे आहे :

राहो दोन लाल सुखी
हेच देवाले मागनं
त्यात आलं रे नशीब
काय सांगे पंचागन!

बहिणाबाईंना काशी नावाची मुलगीही होती, पण तिच्या नशिबाचे भान त्यांना या वेळी राहिलेले नाही!

बहिणाबाईंच्या या विषयावरील मुकेपणामागे दुसरेही एक कारण असू शकेल, असे मला वाटते. बऱ्याच वर्षांपूर्वी मी 'खेळू भोंडला मना विरंगुळा' असा लेख लिहिला होता. भोंडल्याच्या अनेक गाण्यांत एक असंबद्धता आहे.

'एक लिंब झेलु बाई, दोन लिंबं झेलू। पाचा लिंबांचा पागोटा। माळ घाली हनुमंता।' इत्यादी. पण प्रत्येक गाण्याच्या 'समे'वर स्त्री-दुःखाचे क्लेशदायी वर्णन आहे.

'अस्सं सासर द्वाड बाई। कोंडूनी मारीतं।।'... 'वेड्याची बायको झोपली होती। मेली मेली म्हणून जाळून टाकिली।।' इत्यादी. ही भोंडल्याची गाणी लहान वयातील माहेरवाशिणी फेर धरून सामूहिक पद्धतीने गायच्या. हे काय घडत होते? जेव्हा अत्यंत क्लेशकारक अनुभव जागृत मनाला पेलणे अशक्य बनते; तेव्हा ते अंतर्मनात दडपले जातात, गाडले जातात. त्यामुळे मानसिक आजार संभवतात, ते अनुभव स्वप्नात 'जागृत' होतात, हे फ्रॉइडने सांगितले. या अल्पवयीन मुलींचे अत्यंत कोवळ्या वयात अनुभवायला लागलेल्या जबरी संभोगाचे, कमालीच्या सासुरवासाचे कमालीचे क्लेशकारक अनुभव अंतर्मनात दडपले गेले, गाडले गेले. ते फक्त सामूहिक गानाच्या-नाचाच्या तंद्रीत, स्वप्नवत् अवस्थेत प्रगट होतात, तेही स्वप्नामधल्या असंबद्ध पद्धतीने? मन अजाणतेपणे या अनुभवांना विसरते. जागृत मनाची, वेडे न बनण्यासाठीची, ती स्वसंरक्षक अजाण कृती असते. या संदर्भात इंदिरा संतांच्या कवितेतील काही ओळी लक्षात घेण्यासारख्या आहेत :

इथे वेदना लालताम्बडी;
इथे बधिरता संगमरवरी;
इथे उसळते रक्त तापुनी,
बेहोशी अन् इथे काळी
'इथे वेदना' (इंदिरा, पृ.२३०)

तप्त निखाऱ्यावर विझताना
तडफडणाऱ्या
त्या दुःखाने मला शापिले
तेंव्हापासून
सदा सारखी हसते... हसते
दुःखवेगळी
भरात... नकळत (इंदिरा, पृ.१८७)

बहिणाबाईंच्या मनात हेच सारे भयानक घडले का? बहिणाबाईंनी आपले मानसिक संतुलन राखण्यासाठी कामाचा, श्रमांचा, त्यांतून मिळणाऱ्या आनंदाचा मार्ग चोखाळला का? नवरा गेला तर मला शोक करत बसायचा नाही; माझ्या मनगटात 'करतूत' आहे, माझ्यासाठी रडत बसणे पुरे झाले, आता मला माझे जगणे जगू द्या- असे त्या सांगतात :

जरी फुटल्या बांगड्या
मनगटी करतूत
तुटे मंगरसूतर
उरे गळ्याची शपथ
नका नका आया बाया
नका करू माझी कीव
झालं माझं समाधान
आता माझा माले जीव

हे सगळे बहिणाबाईंच्या मनाने अतीव दुःखापासून केलेले अजाण स्वसंरक्षण आहे का? नाहीच, याची मला खात्री नाही.

मग माझ्या मनात एक प्रश्न येतो- जर स्त्रीमुक्ती चळवळीचा विचार बहिणाबाईंपर्यंत पोचला असता, जर चळवळीने चालवलेल्या एखाद्या समुपदेशन केंद्राने बहिणाबाईंना 'स्त्री अनुभवांबद्दल', 'स्त्री जाणिवांबद्दल' बोलके केले असते... तर? काय कविता वाचायला मिळाली असती याच्या कल्पनेने माझ्या अंगावर काटा उभा राहतो!!

आनंद करंदीकर
anandkarandikar49@gmail.com
Mob. : 9604518539

**शिक्षण**

**अझीम प्रेमजी**

बदल घडवण्यासाठी दुर्बलांचे सक्षमीकरण करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि त्यांना पुढाकार देणे हे अपेक्षित आहे. आपण त्यासाठी पोषक वातावरण व योग्य ती मदत केली पाहिजे. सर्वांत मूलभूत गोष्ट म्हणजे, आपली स्वत:ची शिक्षण पद्धतीवरील निष्ठा पुन्हा प्रस्थापित केली पाहिजे.
सुसंस्कृत समाजासाठी भरभक्कम सामाजिक संस्थांची, यंत्रणांची आणि उच्च दर्जाच्या शैक्षणिक संस्थांची अत्यंत गरज आहे.

# भारत महान कसा बनवता येईल

अलीकडेच मी उत्तर-पूर्व कर्नाटकाची सहल केली आणि काही काळ गुलबर्गा, विजापूर व यादगीर या जिल्ह्यांमध्ये घालवला. त्यात विशेषत: काही गावे व खेडी यांचाही समावेश होता. मुख्यत: मी सरकारी शाळा, त्यांतील मुले, शिक्षक आणि इतर संस्थांबरोबर होतो.

कर्नाटकाचा हा भाग बराचसा मागासलेला आहे. तिथली सामाजिक परिस्थिती त्या आठवड्यात मला खूप अस्वस्थ करून गेली. आपल्या लाखो बांधवांना किती अन्याय आणि हीन दर्जाची वागणूक सहन करावी लागते, हे प्रत्यक्ष पाहून मन उद्विग्न झाले. अशा प्रतिकूल परिस्थितीतही मला अशा काही उत्साही आणि प्रभावी व्यक्ती भेटल्या की, माझ्या मनातील आशेचा दीप पूर्णपणे प्रज्वलित झाला! पुढील दोन उदाहरणांवरून तुम्हाला ते नक्कीच पटेल.

एका १६ वर्षीय तरुणीशी माझी भेट झाली. तिने पोलीस खात्यात नोकरी करायची जिद्द बाळगली आहे. ती आपल्या आयुष्याबद्दल खूप मनमोकळेपणे बोलत होती. एका गुंडाने तिला कसा त्रास दिला आणि तिने त्याला कशी अद्दल घडवली वगैरे... तिचे असामान्य धारिष्ट्य बघून कोणालाही अभिमान वाटेल! तिच्या आजूबाजूचा समाज रूढीग्रस्त, भेदभाव करणारा आणि स्त्रियांना हलक्या दर्जाची वागणूक देणारा आहे. तिचे कुटुंबही अत्यंत मागासलेले आहे आणि परिस्थिती अतिशय प्रतिकूल आहे. तरीही ती धैर्याने आपल्या श्रद्धा, आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षा यावर ठाम राहिली. किती कौतुकास्पद आहे हे! तिथल्या महिलांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांनी व लोकांनी पुढाकार घेऊन तिला आधार दिला आणि तिच्यासारख्या शेकडो जणींना असेच सक्षम होण्यासाठी मदत केली. येथील तरुणांनी आणि सामाजिक संस्थांनी अतूटपणे अन्यायाशी लढा देण्याचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

तेथील गावांमध्ये आणि खेड्यापाड्यांमध्ये मला सरकारी शाळांमधील शेकडो शिक्षकांना भेटण्याची संधी मिळाली, ते सर्व निष्ठावंत ध्येयाने भारलेले व तळमळीने काम करणारे शिक्षक आहेत. पदरचा पैसा व वेळ खर्च करून ते सुट्टीच्या दिवशीसुद्धा स्वत:चे प्रशिक्षण करून घेण्यात रस घेतात. आपण उत्तम शिक्षक कसे होऊ याचा त्यांना ध्यास आहे. आय.टी. उद्योगातील असे किती जण सुट्टीच्या दिवशी नवे काही शिकण्यासाठी वेळ व पैसे खर्च करतील आणि स्वत:ची गुणवत्ता, ज्ञान वाढवतील? मला शंका वाटते. त्याउलट, ह्या शिक्षकांना आपल्या मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आधी आपण नवे ज्ञान मिळवत राहिले पाहिजे याची पूर्ण जाणीव आहे.

खरे म्हणजे कर्नाटकातला हा अनुभव भारतात सर्वत्र

मिळतो. दहा-वीस टक्के शिक्षक ध्येयाने इतके भारावलेले आहेत की, त्यांच्या मागोमाग संपूर्ण शाळेत सकारात्मक बदल होऊ लागतात. त्याउलट, दहा-वीस टक्के शिक्षक उदासीन असतात; परंतु उरलेले ६० टक्के अशा भारलेल्या वातावरणात खूप सकारात्मक कामे करू शकतात. नव्याने रुजू होणारे तरुणही मग आदर्श शिक्षक होण्याच्या दिशेने वाटचाल करू लागतात. यामुळे माझ्या मनात भारताच्या भविष्याबद्दल खूप आशादायी चित्र निर्माण झाले आहे. सरकारी शिक्षक व संस्थांतील पदाधिकारी हे समाजसुधारणा घडवण्यात खूप मोठा सक्रिय हातभार लावत आहेत!

आपल्या शाळा-कॉलेजेसमध्ये खूप त्रुटी आहेत आणि त्यातील अडचणींची आपल्याला जाणीव आहे. वर उल्लेखिलेली ही सकारात्मक ऊर्जा आपल्याला खूप वेगाने सुधार घडवायला उपयोगात आणता येईल. केवळ यंत्रणांमधील दोष दाखवून काहीच हाती येणार नाही.

बदल घडवण्यासाठी दुर्बलांचे सक्षमीकरण करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे व त्यांना पुढाकार देणे हे अपेक्षित आहे. आपण त्यासाठी पोषक वातावरण व योग्य ती मदत केली पाहिजे. सर्वांत मूलभूत गोष्ट म्हणजे, आपली स्वत:ची शिक्षण पद्धतीवरील निष्ठा पुन्हा प्रस्थापित केली पाहिजे.

सुसंस्कृत समाजासाठी भरभक्कम सामाजिक संस्थांची, यंत्रणांची आणि उच्च दर्जाच्या शैक्षणिक संस्थांची अत्यंत गरज आहे. आम्ही १५ वर्षांपूर्वी जेव्हा सामाजिक निधी (फाउंडेशन) स्थापन केला; तेव्हाच त्याचे उद्दिष्ट ठरवले की, राज्य सरकारांबरोबर काम करायचे आणि शालेय शिक्षणामध्ये सुधार घडवून आणायचा. सरतेशेवटी मी हे म्हणेन की, आयुष्यात मी हे शिकलो की, सामान्य माणसे खूप असामान्य गोष्टी घडवून आणतात. त्यांच्यावर विश्वास ठेवला, जबाबदारी टाकली, त्यांना प्रोत्साहन दिले आणि त्यांचे सक्षमीकरण केले तर ते शक्य आहे. प्रथमत: हे केले तरच इतर प्रयत्नांचा उपयोग होईल.

आपल्या देशाची भव्यता आणि विविधता लक्षात घेता; एक गोष्ट नक्की की, कोणी एक महामानव आपल्या देशात बदल घडवून आणू शकणार नाही; त्यात सामान्य नागरिकांचा सहभाग वाढवणे आणि त्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. त्यामध्ये शिक्षक, आरोग्य कर्मचारी, मध्यम श्रेणीतील सरकारी पदाधिकारी, इतर कार्यकर्ते आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांचा सहभाग आवश्यक आहे.

मला खात्री आहे की, हे शक्य आहे! मी हे घडताना पाहिले आहे. उत्तर-पूर्व कर्नाटकात हे पाहण्याची मला संधी मिळाली. १६ वर्षांच्या मुलीने पोलीस अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगलेले मी पाहिले. अशी जिद्दच आपला भारत एक सुंदर आणि महान राष्ट्र बनवेल. आपल्या संविधानाला हेच अपेक्षित आहे.

आपण सर्वांनी त्यासाठी झटले पाहिजे.

मराठी अनुवाद : साधना जगताप

*(अझीम प्रेमजी, अध्यक्ष विप्रो लिमिटेड यांनी आय.पी.एस. व आय.ए.एस. अधिकाऱ्यांशी अलीकडेच वार्तालाप केला. त्याचा गोषवारा २२ डिसेंबर २०१५ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया' दैनिकात आला आहे.)*

## साधना वाचक मेळावे

वेगवेगळ्या ठिकाणच्या साधना वाचक-लेखक-हितचिंतकांनी मागील काही महिन्यांत केलेल्या पाठपुराव्याला प्रतिसाद म्हणून, पुढील वर्षभर प्रत्येक महिन्यात दोन जिल्ह्यांच्या ठिकाणी वाचकमेळावे घेण्याचा निर्णय झाला आहे. त्या-त्या जिल्ह्यातील/परिसरातील साधनाचे वाचक-लेखक-हितचिंतक मेळाव्याला उपस्थित राहतील, अशी अपेक्षा आहे. साधना अंकांच्या स्वरूपावर चर्चा करणे, नवे लेखक-वाचक जोडणे, पुस्तकांचे वितरण आणि बालकुमार व युवा अंकांच्या मोहिमेला मदत करणे असे उद्देश या मेळाव्याच्या आयोजनामागे आहेत. पहिला वाचक मेळावा सांगली येथे झाला. दुसरा वाचक मेळावा पालघर येथे झाला. पुढील तीन मेळाव्यांच्या तारखा व ठिकाणे निश्चित झाली आहेत. स्थळ, वेळ व अन्य चौकशीसाठी संपर्क व्यक्तींची नावे व फोन नंबर देत आहोत.

**३. अहमदनगर : शनिवार, २३ जानेवारी २०१६**

रवींद्र सातपुते : Mob.: 9890001685, किशोर रक्ताटे : Mob.: 9767581617

**४. लातूर : शनिवार, ६ फेब्रुवारी २०१६** (साहित्य संमेलनामुळे या वाचक मेळाव्याची तारीख बदलली आहे.)

सूर्यकांत वैद्य : Mob.: 9422071606, माधव बावगे : Mob.: 9404870435

**५. नाशिक : रविवार, ७ फेब्रुवारी २०१६**

कृष्णा चांदगुडे : Mob.: 9822630378, सुदीप गुजराथी : Mob.: 9850068610

# उद्योगिनी

स्त्री उद्योजक / व्यावसायिकांसाठी खास अर्थयोजना

मोठी स्वप्नं पाहावीत आणि त्यांना ती प्रत्यक्षात उतरवता यावीत यासाठी.

## खास वैशिष्ट्ये :

● मायक्रो, लहान व मध्यम उद्योगांसाठी अर्थसहाय्य ● स्त्री प्रोफेशनल्ससाठी
● रू. १ कोटींपर्यंत अर्थसहाय्य ● वाजवी कमी व्याजदर ● वाजवी प्रोसेसिंग फी
● अर्जांची त्वरित छाननी ● मार्जिनवर खास सवलत ● छुपे खर्च नाहीत ● परफेडीची वाढीव मुदत



*अटी लागू

आमच्या SME विभागाशी अवश्य संपर्क साधा. - ९८२०५०६०६३ / ९९६७५९६०५५

सारस्वत बँक

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेडयुल्ड बँक)

पुणे झोन - ८/३, एरंडवणा, कर्वे रोड, नळ स्टॉप जवळ, पुणे ४११ ००४

Website:www.saraswatbank.com email:customerservicecentre@saraswatbank.com

Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ / रजि.क्र. पी.सी.डब्ल्यू./०८०/२०१५–१७
Posted at Marketyard PSO, Pune / Posting Every Thursday/Date of Publication : 14-01-2016

## विद्यार्थी–पालक–शिक्षक यांना जोडणारी आणि सजग–सक्रिय करू शकणारी पुस्तके...

**७०० रुपयांचा ६ पुस्तकांचा संच ५०० रुपयांत**

टपाल खर्च वेगळा




पाने १२८
किंमत रुपये १२५





पाने १२८
किंमत रुपये १२५




पाने १४०
किंमत रुपये १२५

पाने १००
किंमत रुपये १००




पाने १००
किंमत रुपये १००




पाने १४०
किंमत रुपये १२५




संपर्क : साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३० फोन ०२० २४४५९६३५ sadhanaprakashan@gmail.com